



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १६८ * नांदेड * गुरूवार, दि. २५ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मुंबईसह राज्यभरात पावसाची हजेरी

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईसह राज्यात मॉन्सून दाखल झाला. जोरदार पाऊस सर्वदूर सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून रखडलेला मॉन्सून राज्यात दाखल झाला. दमदार पाऊस सुरू आहे. शेतकऱ्यांसाठी ही आनंदाची बाब आहे. तसेच २५, २६, २७, २८ पर्यंत राज्यात असाच धो धो पाऊस राहण्याचा अंदाज आहे. अनेक भागात रात्रभर पाऊस सुरू आहे. मुंबईसह उपनगरांमध्ये रात्रभर पाऊस होता. अनेक भागात पाणी साचले आहे. कुर्ला, किंग सर्कल आणि सायनमध्ये पाणी साचले. भारतीय हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पालघरमध्ये पावसाचा येलो अलर्ट जारी केला. मॉन्सून राज्यभरात पसरला आहे. पुढील ३ तास अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला. या पावसामुळे रस्ते जलमय झाले. पुढील दोन ते तीन दिवस अरबी समुद्र, महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेशच्या दिशेने मॉन्सून पुढे सरकत आहे.



नांदेड : मोठ्या प्रतिक्षेनंतर नांदेड शहरातही पावसाचे आगमन झाले.

मुंबई उपनगरात पावसाचा जोर कायम आहे. बुधवारी संध्याकाळपासून कांदिवली, मालाडसह अनेक भागात जोरदार पाऊस सुरू असून सखल भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. कांदिवलीतील गणेश नगर आणि मालाड पूर्व येथील कुरार गावातील कोंकणी पाडा या भागात पावसाचे पाणी साचले आहे. याशिवाय इतरही अनेक सखल भागात जलजमावसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

मंगळवारी संध्याकाळपासून पाऊस थांबलेला नाही. अधूनमधून जोरदार सरी येत आहेत. त्यामुळे पाण्याची पातळी आणखी वाढण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. सध्या उपनगरात पाऊस सुरूच आहे. हवामान खात्याने पुढील काही तासांसाठी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. कल्याण-डोंबिवलीत सकाळपासून ढगाळ वातावरणासह रिमझिम पावसाची हजेरी

अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर गेल्या दोन दिवसांपासून शहरात पावसाची सुरुवात. काल काही भागांत पावसाचा जोर वाढल्याने पाणी साचल्याच्या घटना. मात्र काही वेळातच पावसाचा वेग कमी होताच साचलेल्या पाण्याचा झाला निचरा. उकाड्यापासून नागरिकांना दिलासा, वातावरणात गारवा तर दुसरीकडे पावसामुळे अनेक ठिकाणी महावितरणाची खांब पडल्याने बत्ती गुल झाली. राज्यभरात पाऊस बघायला मिळत आहे.

## कोलकात्यात बांधकामाधीन गोदाम कोसळून ३ ठार

### ४० हून अधिक लोक दबल्याची शक्यता

**कोलकाता (प्रतिनिधी)–** दक्षिण कोलकातामधील ताराताला ट्रान्सपोर्ट डेपोजवळ बुधवारी दुपारी १.३० वाजता बांधकाम सुरू असलेल्या गोदामाचे शेड अचानक कोसळले. या घटनेत आतापर्यंत ३ लोकांचा मृत्यू झाला आहे. ४० हून अधिक लोक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, आतापर्यंत १४ लोकांना वाचवण्यात आले आहे.

स्थानिक लोकांच्या मते, अपघाताच्या वेळी गोदामात काँक्रीट टाकण्याचे काम सुरू होते. पोलिसांच्या माहितीनुसार, बचावकार्यात कोलकाता पोलीस, आपत्कालीन व्यवस्थापन गट, नागरी संरक्षण, अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा तसेच लष्करही सहभागी झाले आहे.

ढिगारा आणि लोखंडी सळ्या हटवण्यासाठी क्रेन मागवण्यात आली आहे. गॅस कटरने लोखंडी सळ्या कापल्या जात आहेत. ढिगाऱ्याखाली दबलेल्या मजूर-कर्मचाऱ्यांच्या किंकाळ्याही ऐकू येत आहेत, त्यांना लवकरात लवकर वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## पुढच्या २४ तासांमध्ये राज्यात पाऊस; १७ जिल्ह्यांना हाय अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** मान्सून महाराष्ट्रात दाखल होऊन, जवळपास २० दिवस उलटले होते. मात्र राज्यात पावसाने हजेरी न लावल्याने चिंता वाढली होती. परंतु आता गेल्या २४ तासांमध्ये राज्यातील विविध भागांमध्ये जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. मुंबईसह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस झाला आहे. दरम्यान २२ जूननंतर राज्यात मान्सून पुन्हा एकदा सक्रिय होईल आणि जोरदार पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला होता. त्यानुसार आता मंगळवारपासून राज्यात पावसाला सुरुवात झाली आहे. येत्या ३० जूनपर्यंत मान्सूनची हीच स्थिती कायम असेल असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

महाराष्ट्रात पावसाचा जोर आणखी वाढत जाणार आहे, पुढील काही तासांमध्ये जळगाव जिल्हा, धुळे जिल्हा, नंदुरबार जिल्हा, नाशिक जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, बीड जिल्हा, परभणी जिल्हा, जालना जिल्हा, बुलाढाणा जिल्हा, अकोला जिल्हा, अमरावती जिल्हा, भंडारा, वर्धा, नागपूर जिल्हा, यवतमाळ जिल्हा असा सर्वत्र जोरदा पाऊस होणार आहे.

शेतकऱ्यांना काळजी करण्याचं कारण नाही, सगळ्या शेतकऱ्यांचा पेरण्या होणार आहेत. पूर्व विदर्भ, पश्चि विदर्भ, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र कोकण किनारपट्टी, खानदेश, मराठवाडा, या सर्व भागांमध्ये जोरदार पाऊस होणार आहे. हा पाऊस वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी हजेरी लावणार आहे, मुंबई, पुणे, घाटमाथा, नाशिक, रत्नागिरी ते रायगड या पट्ट्यामध्ये आज जोरदार पावसाची शक्यता आहे. त्यानंतर हा पाऊस मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राकडे सरकरणार आहे, असा अंदाज वर्तवला आहे.


मुंबई/नांदेड : स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीत विजयी झाल्यानंतर आ. अमरनाथ राजूरकर यांनी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्याप्रसंगीच्या छायाचित्रात मृणाल राजूरकर, डॉ. आशुतोष राजूरकर, मृण्मयी राजूरकर आदी दिसत आहेत.

## नांदेड जिल्ह्यासाठी तीन दिवस येलो अलर्ट जारी

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि. २४ जून २०२६ रोजी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. २५ ते २७ जून २०२६ हे तीन दिवस येलो अलर्ट जारी केलेला आहे.

दि. २६ व २७ जून २०२६ हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा व दि. २५ जून २०२६ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी



वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे.

## व्यवसायात भागीदारीचे आमिष दाखवून ३० लाखांना फसविले, गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** व्यवसायात २० टक्के भागीदारी देण्याचे आमिष दाखवून ३० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १२ जानेवारी २०२५ ते २५ मार्च २०२६ या कालावधीत कौठा व नेरली एसबीआय शाखा तरोडा परिसरात शेख नूर अहमद शेख (रा. पोचमपाड, जि. निजामाबाद) यांनी फिर्यादीचा विश्वास संपादन करून व्यवसायात भागीदारी देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर रोख व ऑनलाईन पद्धतीने एकूण ३० लाख रुपये स्वीकारले. मात्र, आश्वासनाप्रमाणे कोणताही लाभ न देता फसवणूक केल्याचा




आरोप करण्यात आला आहे.

याबाबत रामचंद्र तुकाराम मलशेटवार (वय ६४, रा. विकासनगर, कौठा, जि. नांदेड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाबुराव चव्हाण करत आहेत.

## आयपीएस निलभ रोहन पोलीस अधीक्षकपदी रूजू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षकपदी निलभ रोहन हे रूजू झाले आहेत. यावेळी मावळते पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी त्यांचे स्वागत केले. नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारीवर आळा घालून कायदा व सुव्यवस्था निर्माण करतील अशी अपेक्षा नांदेडकरांकडून व्यक्त होत आहे.

निलभ रोहन हे कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय आणि कठोर प्रशासन शैलीमुळे ओळखले जातात. २०१६ बॅचचे महाराष्ट्र कॅडरचे हे अधिकारी मूळचे उत्तर प्रदेशातील असून त्यांनी बी.एस्सी.पर्यंत शिक्षण घेतले आहे.

निलभ रोहन यांनी आपल्या सेवाकार्यात विविध महत्त्वाच्या पदांवर जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. प्रशिक्षण काळात त्यांनी इचलकरंजी येथे परिविक्षाधीन पोलीस अधिकारी म्हणून काम केले. त्या काळात अवैध व्यवसायांवर केलेल्या कठोर कारवाईमुळे ते विशेष चर्चेत आले होते. त्यानंतर त्यांनी जळगाव येथे सहाय्यक पोलीस अधीक्षक म्हणून सेवा बजावत कायदा व सुव्यवस्था राखण्यात महत्त्वाची भूमिका निभावली.

पुढे नागपूर येथे विशेष कृती दलात (स्पेशल ॲक्शन फोर्स) त्यांनी संवेदनशील जबाबदाऱ्या सांभाळल्या. तसेच २०२१ मध्ये त्यांची केंद्रीय प्रतिनियुक्तीवर कॅबिनेट सचिवालयात नियुक्ती झाली होती.

दहशतवाद विरोधी कारवायांम



ध्येही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकात (एटीएस) पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांनी गुप्त माहिती संकलन, सुरक्षा व्यवस्थापन आणि दहशतवादविरोधी मोहिमांमध्ये प्रभावी नेतृत्व केले.

यानंतर २३ डिसेंबर २०२५ रोजी त्यांनी हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारताच त्यांनी कायदा-सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध, शिस्त आणि जबाबदारी यांना प्राधान्य देण्याचे स्पष्ट संकेत दिले.

आता ते नांदेड जिल्ह्याच्या जिल्हा पोलीस अधीक्षकपदी रूजू झाले आहेत. पोलीस उपायुक्तपदी बदली झालेले नांदेड येथील पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारीवर वचक निर्माण केला होता. तशाच वचक नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक निलभ रोहन करतील अशी अपेक्षा नांदेडकरांकडून व्यक्त होत आहे.

## डीवायएसपी डॉ. अश्विनी जगताप नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अप्पर पोलीस अधीक्षकपदी

### माणिक बेद्रे इतवारा विभागाचे डीवायएसपी

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य शासनाच्या गृह विभागाने २३ जून रोजी पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या व नियुक्त्यांचे आदेश जारी केले असून, त्यामध्ये नांदेड जिल्ह्यासह विविध ठिकाणच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या आदेशानुसार, कंधार उपविभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांची नांदेड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागात अप्पर पोलीस अधीक्षक पदावर बदली करण्यात आली आहे. तर माणिक बेद्रे यांची इतवारा विभागाचे डीवायएसपी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

यासह नांदेड येथील राज्य गुप्त वार्ता विभागाचे अप्पर उपायुक्त राजेंद्र टाकणे यांची सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून बदली करण्यात आली आहे.

मुंबई शहरातील सहाय्यक पोलीस आयुक्त माणिक बेद्रे यांची नांदेड येथे ग्रामीण उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, नागपूर शहरातील सहाय्यक पोलीस आयुक्त किरण पोपळघट यांची संकेत गोसावी यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या नांदेड जिल्ह्यातील देगलूर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय, नांदेड येथील इतवारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक खन्नाळ यांची नांदेड येथील सीआयडी विभागात उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच डायल ११२ चे बबन कराळे यांना आर्थिक गुन्हे शाखेत हिंगोली येथे पोलीस उपाधीक्षक पदी भरती देण्यात आली आहे. यासोबतच एटीएसचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांना जालना येथे आर्थिक गुन्हे शाखेत उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून पाठविण्यात आले आहे. हिंगोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी कुंदन कुमार वाघमारे यांच्यावर पूर्ण उपविभागाची जबाबदारी सोपविण्यात आली असून नामदेव रिठे हे परभणी उपविभागात सेवा देणार आहेत. अर्धापूर ते चंद्रशेखर कदम यांना पोलीस उपाधीक्षक महामार्ग छत्रपती संभाजीनगर येथे पाठविण्यात आले आहे. संजय देशमुख यांना छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) आर्थिक गुन्हे शाखा देण्यात आली आहे.




## पीएम सूर्यघर मुक्त बिजली योजनेत जिल्ह्यात बारड गाव प्रथम; १ कोटीचे बक्षीस

**मुदखेड (प्रतिनिधी)–** केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पीएम सूर्यघर मुक्त बिजली योजना' अंतर्गत 'मॉडेल सोलर व्हिलेज' स्पर्धेत नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यातील बारड गावाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या घवघवीत यशामुळे बारड गावाला शासनाकडून १ कोटी रुपयांचे भव्य बक्षीस मिळणार आहे. महावितरणचे नांदेड परिमंडळाचे अधीक्षक अभियंता संजय कंधारे यांच्या हस्ते बारड गावच्या निवडीचे अधिकृत पत्र नुकतेच प्रदान करण्यात आले.

शासनामार्फत दि. १४ नोव्हेंबर २०२५ ते १४ मे २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीत ही स्पर्धा राबविण्यात आली होती. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील ५,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ३१ गावे निवडली गेली होती. या सर्व गावांना



मागे टाकत बारड गावाने सौर ऊर्जेच्या निर्मितीत अव्वल स्थान गाठले.

बारड ग्रामपंचायतीने स्वतःच्या मालकीच्या ३५ एकर गायरान जमिनीवर सौर प्रकल्प उभारला आहे, ज्याच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा हक्काची वीज मिळत आहे.

अभियान काळात गावातील नागरिक, व्यापारी आणि शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सोलर यंत्रणा बसवली. यामुळे बारड गावची एकूण सौर ऊर्जा निर्मिती क्षमता तब्बल ९२८ केडब्ल्यू (किलोवॅट) झाली आहे.

जिल्ह्यातील सहभागी गावांमध्ये ही क्षमता सर्वाधिक असल्याने बारड गावाची १ कोटी रुपयांच्या बक्षिसासाठी निवड झाली.

महावितरणचे अधीक्षक अभियंता संजय कंधारे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देताना ज्येष्ठ नेते बाळासाहेब देशमुख बारडकर, उपसरपंच प्रदीप देशमुख, भाजप जिल्हा कोषाध्यक्ष दिगंबरराव टिपरसे, भाजप तालुका सरचिटणीस सचिन पाटील मगरे, येळेगावचे युवा कार्यकर्ते नवनाथ कपाटे आणि जी. एस. सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते.

## आ. रोहित पवार आज नांदेडमध्ये

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आमदार रोहित पवार हे आज गुरुवारी सायंकाळी ६ वाजता नांदेड येथे येत असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी या मागणीसाठी त्यांनी यापूर्वी पंढरपूर येथे अन्नत्याग आंदोलन केले होते. त्यावेळी सरकारने केवळ आश्वासन दिले, मात्र त्याची अंमलबजावणी न केल्यामुळे २९ जून रोजी ते पुन्हा आंदोलन करणार असून, याच पार्श्वभूमीवर त्यांचा हा नांदेड दौरा होत आहे.



नांदेडला आगमन झाल्यानंतर सायंकाळी ६ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आमदार रोहित पवार यांची पत्रकार परिषद होणार आहे. त्यानंतर ते राष्ट्रवादी काँग्रेससह महाविकास आघाडीतील मित्रपक्ष असलेल्या काँग्रेस आणि शिवसेना (ठाकरे गट) यांच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत त्यांची महत्त्वाची बैठक पार पडणार आहे.

दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजेच २६ जून रोजी सकाळी, आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त नांदेड शहरातील शाहू महाराजांच्या पुतळ्याला आमदार पवार अभिवादन करतील. या अभिवादन कार्यक्रमानंतर त्यांचा पुढील दौरा सुरू होईल. आमदार रोहित पवार यांच्या विविध बैठका आणि स्वागतासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर यांनी केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# त्रिभाषा सूत्र: वाद कशाला?

भारत हा विविध भाषांचा देश आहे. प्रत्येक राज्याची स्वतःची भाषा, संस्कृती आणि परंपरा आहे. या विविधतेतूनच देशाची ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे भाषेचा प्रश्न हाताळताना संवेदनशीलता आणि व्यापक विचारांची गरज असते. मात्र नव्या त्रिभाषा सूत्रामुळे शिक्षणाच्या क्षेत्रात अनावश्यक गुंतागुंत निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. म्हणूनच सध्याच्या भाषिक वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सीबीएसई शाळांमध्ये लागू करण्याचे ठरविलेल्या नव्या त्रिभाषा सूत्राबाबत देशभरात चर्चा सुरू झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने या धोरणाला तत्काळ स्थगिती देण्यास नकार दिला असला, तरी त्याच्या अंमलबजावणीसंदर्भात उपस्थित झालेले प्रश्न अधिक महत्त्वाचे ठरतात. कारण हा विषय केवळ भाषा शिकविण्याचा नसून देशाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक भवितव्याशी निगडित आहे. या धोरणानुसार विद्यार्थ्यांना सहावीपासून तीन भाषा शिकाव्या लागतील, त्यापैकी दोन भारतीय भाषा असणे बंधनकारक राहील. इंग्रजीला भारतीय भाषांमध्ये समाविष्ट न करता तिला जर्मन किंवा फ्रेंचसारख्या परदेशी भाषांच्या श्रेणीत ठेवण्यात आले आहे. यामुळे अनेक विद्यार्थ्यांसमोर अचानक नवीन भाषा शिकण्याचे आव्हान उभे राहणार आहे. विशेषतः ज्यांनी गेली अनेक वर्षे एखादी परदेशी भाषा शिकली आहे, त्यांना ती सोडून नव्याने संस्कृत किंवा अन्य भारतीय भाषा आत्मसात करावी लागणार असल्याने शैक्षणिक ताण वाढू शकतो. भारतीय भाषा शिकणे ही चांगलीच बाब आहे, परंतु या धोरणासाठी आवश्यक असलेली यंत्रणा देशभरात उपलब्ध आहे का, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. प्रशिक्षित भाषा शिक्षक, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य आणि आवश्यक पायाभूत सुविधा यांचा पुरेसा विचार न करता धोरण लागू केल्यास त्याचा फटका विद्यार्थ्यांनाच बसणार आहे. सर्वोच्च न्यायालयानेही याच मुद्द्यावर केंद्र सरकार, सीबीएसई आणि एनसीईआरटीकडून सविस्तर माहिती मागविली आहे. यावरूनच या विषयातील गुंतागुंत स्पष्ट होते. भाषेच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता वाढविण्याचा उद्देश नक्कीच स्तुत्य आहे. भारतीय भाषांचे संवर्धन आणि प्रसार होणे आवश्यकच आहे. परंतु ते सक्तीने नव्हे तर प्रोत्साहनातून साध्य व्हायला हवे. भाषा ही संवादाचे माध्यम असते; ती संघर्षाचे कारण बनता कामा नये. विशेषतः शिक्षण क्षेत्र हे भाषिक किंवा सांस्कृतिक संघर्षाचे रणांगण बनणे देशाच्या हिताचे नाही. तामिळनाडूसारख्या राज्यांनी दीर्घकाळापासून द्विभाषिक धोरण स्वीकारले आहे. तेथे तमिळ आणि इंग्रजी या दोन भाषांवर आधारित शिक्षणपद्धती यशस्वीपणे चालत आली आहे. पण हा सुद्धा एकांगीपणाच आहे. त्यांचा हिंदी भाषेबद्दलचा द्वेष यातून स्पष्ट होतो. परंतु हिंदी भाषा ही संपूर्ण देशामध्ये कमी अधिक प्रमाणात बोलली जाते तेव्हा ती शिकणे आवश्यकच आहे. याला विरोध करणे चुकीचे आहे. शिक्षण हा समवर्ती सूचीतील विषय असल्याने राज्यांच्या भूमिकेलाही तितकेच महत्त्व आहे. अशा परिस्थितीत केंद्राने एकतर्फी निर्णय घेण्याऐवजी राज्यांशी व्यापक संवाद साधणे अधिक योग्य ठरले असते. तसेच इंग्रजीबाबतही वास्तववादी दृष्टिकोन आवश्यक आहे. जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी ही केवळ परकीय भाषा राहिलेली नाही. उच्च शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि रोजगाराच्या संधी यांमध्ये तिचे महत्त्व निर्विवाद आहे. भारतीय भाषांचे संवर्धन करताना इंग्रजीचे महत्त्व कमी लेखणे म्हणजे भविष्यातील पिढ्यांना जागतिक स्पर्धेत मागे टाकण्याचा धोका निर्माण करणे होय. खरे तर भारताला भाषिक संतुलनाची गरज आहे. मातृभाषेचे संवर्धन, भारतीय भाषांचा सन्मान आणि इंग्रजीचे व्यावहारिक महत्त्व यांचा समतोल साधणारे धोरणच काळाची गरज आहे. भाषेच्या नावाखाली विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ओझे टाकण्यापेक्षा त्यांना बहुभाषिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी सक्षम वातावरण निर्माण करणे अधिक आवश्यक आहे. कारण कोणतेही शैक्षणिक धोरण विद्यार्थीकेंद्रित असले पाहिजे. भाषिक अस्मिता आणि राजकीय भूमिका यांपेक्षा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित सर्वोच्च मानले गेले पाहिजे. नव्या त्रिभाषा सूत्राचा पुनर्विचार करून सर्व संबंधित घटकांचा सहभाग असलेला व्यापक संवाद घडवून आणणे हीच आजची गरज आहे. अन्यथा शिक्षणाचा परिसर ज्ञानवृद्धीचा मंच न राहता भाषिक संघर्षाचे केंद्र बनण्याचा धोका नाकारता येणार नाही.

# आणीबाणीमुळे लोकांना लोकशाहीचे महत्त्व कळले




आज २५ जून, भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला आज ५० वर्षे पूर्ण झाली. बरोबर ५० वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाली. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना पुढील सहा वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घातली.

राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत गैरव्यवहार केला असा आरोप करून खटला दाखल केला होता या खटल्याच्या निकाल १२ जूनला लागला. या निकालानंतर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द झाल्याने त्यांनी पंतप्रधानपद सोडावे अशी मागणी होऊ लागली.

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सुट्टीच्या काळातील न्यायाधीश व्ही. आर कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती देण्यास नकार दिला मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिराजींना पंतप्रधान पदावर राहण्यास मुभा दिली. हा निर्णय आल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी २५ जून १९७५ च्या रात्री देशात आणीबाणी लागू केली.

आणीबाणीच्या मसुद्यावर तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी रात्री बारा वाजता स्वाक्षरी केली. आणीबाणी लागू झाल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या हातात अनिर्बंध सत्ता आली. माध्यमांची मुस्कटदाबी सुरू झाली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, मधु दंडवते, रामकृष्ण हेगडे, सिखंदर बख्त, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासह अनेक मोठे नेते तसेच पत्रकारांना मिसा कायद्याखाली तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीच्या २१ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख लोकांना तुरुंगवास भोगावा लागला. सक्तीची नसबंदी आणि झोपडपट्टी हटवून शहरे सुशोभित करण्याच्या मोहिमेत लोकांवर जुलूम जबरदस्ती करण्यात येऊ लागले. त्यामुळे देशभर भीतीचे आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले. सुरवातीला दहशतीत असणारे नागरिक या अन्यायाविरुद्ध नंतर रस्त्यांवर उतरू लागले. सामाजिक कार्यकर्ते, नेते, अभिनेते, कलाकार, बुद्धीवादी लोक, साहित्यिक असे सारे लोक आणीबाणीच्या विरोधात एकवटले. सर्व स्तरातून आणीबाणीला विरोध होऊ लागला.

संपूर्ण देश आणीबाणीच्या विरोधात एकवटल्याचे पाहून इंदिरा गांधी यांनी आणीबाणी सैल करून १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत इंदिरा गांधी, संजय गांधी यांचा दारुण पराभव झाला. विरोधी पक्ष असलेल्या जनता पार्टीचे सरकार आले. मोरारजी देसाई हे पंतप्रधान बनले. पण या सरकारमध्ये कमालीचा अंतर्विरोध होता. हाती आलेली सत्ता या विरोधी पक्षांना टिकवता आली नाही. पुढील निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान बनल्या. आणीबाणी ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळे पर्व म्हणून ओळखली जाते. ४९ वर्षांपूर्वी घडलेल्या या दिवसातील घडामोडींनी देशाला लोकशाहिवरील श्रध्येचे महत्त्व काय आहे याची जाणीव करून दिली. भारताच्या इतिहासातील या घटनेची आठवण म्हणजे कोणाला चांगले वाईट ठरवणे नसून लोकशाहीची ताकद व सामर्थ्य यांचे स्मरण होय.

–श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# स्त्री–पुरुष समानता अद्याप दूरच!



आज स्त्री–पुरुष समानतेचा नवा अध्याय लिहिण्याची चर्चा सुरू असताना लहान मुलींवरील बलात्काराच्या बातम्या वाचून आणि ऐकून आपल्या मनात संतापाच्या लाटा उसळतात. बस, ट्रेन, सार्वजनिक ठिकाणी महिलांची चेष्टा करणे, त्यांचे कपडे, राहणीमान, बोलणे, शारीरिक रूप, रंग इत्यादींबद्दल असभ्य टिप्पण्या करणे, घरगुती महिलांच्या कामाचे अवमूल्यन करणे इत्यादी गोष्टी म्हणजे स्वतःच एक दुःखद आश्चर्य आहेत. खरे तर, खऱ्या अर्थाने स्त्री–पुरुष समानता संपूर्ण जगात अजून खूप दूरची गोष्ट आहे. संयुक्त राष्ट्राने महिला समानतेबाबत २०१७ ते २०२२ या कालावधीत जगभरातून गोळा केलेल्या आकडेवारीच्या आधारे असे म्हटले आहे की, दहापैकी नऊ जणांना महिलांबाबत भेदभाव वाटतो. पंचवीस टक्के पुरुषांना त्यांच्या पत्नीला मारहाण करण्यात काही नुकसान किंवा वाईट दिसत नाही. पन्नास टक्के लोकांचा असा विश्वास आहे की पुरुष चांगले राजकारणी आहेत. स्वतःला महिला समानतेचा नेता म्हणवणाऱ्या जर्मनीमध्ये, एका सर्वेक्षणातून असे समोर आले आहे की १०० पैकी ३३ पुरुष अधूनमधून महिलांवर हात उगारणे सामान्य मानतात. असं ते 'आपला सन्मान अबाधित राखण्यासाठी' करतात.

भारतीय समाज आणि व्यवस्थेत महिलांच्या समानतेची आणि अधिकारांची चर्चा आजही वास्तविक संदर्भापासून दूर आहे. घटनेनुसार सर्वांना समान कायदेशीर अधिकार असूनही एका विशिष्ट मर्यादेनंतर या गोष्टी स्त्रीसाठी पुस्तकी बनतात.सामान्य घरातल्या असो किंवा सुशिक्षित घरांतल्या वातावरणाबद्दल बोलायचे झाले तर जवळजवळ सर्व गृहिणींना पैसे कमावणाऱ्या कुटुंबातील पुरुषांकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ऐकावे लागते की 'तुम्ही माझी कमाई खातेस तेव्ह तुला मी सांगतो तसेच वागावे लागेल.' स्वतःच्या पायावर उभं राहून घर चालवणाऱ्या महिलांनाही वेळोवेळी अशा गोष्टींना सामोरे जावे लागते. घरातील किंवा नोकरदार महिलांचे हक्क असोत, विधवाविवाह असोत, वडिलांच्या मालमत्तेतील मुलींचे हक्क असोत, कामाच्या ठिकाणी समानता असो, हुंड्याची समस्या असो, लग्नाशी संबंधित रूढी–परंपरा असोत, प्रत्येक स्तरावर असमानता आहे. मोठी गोष्ट ही आहे की लोकांनी (बहुतेक स्त्रियांनीही) ही विषमता जीवनाची वस्तुस्थिती समजून स्वीकारली आहे. शतकानुशतके चालत आलेल्या परंपरांनी एक प्रकारे संविधान आणि कायद्याच्या गोष्टींना बगल दिली आहे.

अलीकडच्या काळात अनेक स्तरांवर महिलांबाबत मोठ्या वर्गात नकारात्मकतेची भावना वाढली आहे. हे लोकांच्या बोलण्यातून, वागण्यातून पुन्हा पुन्हा सिद्ध होत आहे. स्त्रियांना सूचित करण्यासाठी वापरली जाणारी पारंपरिक वाक्ये जसे– 'स्त्री आहेस, स्त्रीसारखं राहा', 'बांगड्या घालून बसा', 'स्त्री ही घराची इज्जत आहे' इत्यादी आजही जाहीरपणे बोलले जाते. स्त्रियांशी निगडीत शिव्या, नकारात्मक विनोद आणि स्त्रियांवर केलेल्या टिप्पण्या इत्यादी सर्वत्र ऐकायला आणि वापरल्या जाताना दिसतात. या सगळ्यातून समाजाची महिलांबाबतची दुटप्पी मानसिकता दिसून येते. उल्लेख करण्याजोगी गोष्ट ही आहे की, ज्या घरांतून आणि समाजातून मुली आणि स्त्रियांशी संबंधित प्रगती, समानता आणि सन्मानाची परिस्थिती दिसून येते, तिथेच वरील नकारात्मकता दिसून येते. त्याच घरांमध्ये आणि समाजात महिला आणि मुलींसोबत शारीरिक आणि मानसिक दुष्कृत्येही घडतात. अर्धनारीश्वर आणि शक्तिस्वरूपा दुर्गा या संकल्पना असलेल्या समाजात स्त्रियांना भोग, वस्तू आणि तुच्छतेच्या पातळीवर का टाकले जाते? स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या भारतीय समाजात घरापासून ते बाहेरपर्यंतची कोणतीही जागा तिच्यासाठी सुरक्षित का नाही?

आपल्या मुलांच्या हक्काबाबत आपण कसे जागरूक असतो, पण तिथे सून–मुलींचा प्रश्न येताच आपण कसे परंपरावादी बनतो, याचा विचार आपण केला पाहिजे. विशेष म्हणजे भारतीय समाज कायदे आणि नियमाबरोबरच लहान–मोठ्या प्रथा आणि विधींनी चालतो. यातील काहींनी त्यात सौंदर्य आणि रंग भरले आहेत, तर काहींनी अडथळा म्हणूनही काम केले आहे. याने एक बाजू सर्व शक्तीशाली आणि दुसरा वर्ग एक कठपुतळी बनवला आहे. घर–कुटुंब, समाज, चालीरीती, परंपरा या सर्वांनी मिळून स्त्रीविरोधी समाज घडवण्यात आपली भूमिका बजावली आहे. भ्रामक कथा तयार केल्या गेल्या आणि पुरुषांना सर्वशक्तिमान आणि स्त्रियांना गरीब, असहाय आणि गुलाम म्हणून चित्रित केले गेले. त्या सर्व गोष्टी अजूनही आपल्या समाज वातावरणात कमी–अधिक प्रमाणात जिवंत आहेत. समतावादी समाजाच्या निर्मितीसाठी या विचारावर आक्रमण करून समूळ नष्ट करणे आवश्यक आहे. स्त्री–पुरुष समानतेची सुरुवात प्रत्येक घरापासून व्हायला हवी. मुलगा आणि मुलगी दोघांनाही समान हक्क आणि अधिकार आहेत. त्यामुळे बंधने आणि स्वातंत्र्यही दोघांसाठी समान असले पाहिजे. स्त्री समानता आणि सर्व स्तरांवर समानता ही एक उत्तम जग आणि उत्तम समाज निर्माण करण्यासाठी आवश्यक अट आहे.

–मच्छिंद्र ऐनापुरे,
जत, जि. सांगली

# आपण सारेच सामान्य...

प्रसिद्ध अमेरिकन कवयित्री इमिली दिकिन्सन त्यांच्या एका कवितेत माणसाला अंतर्मुख करणारा एक प्रश्न विचारतात. त्या विचारतात Who are you ? आणि पुढे त्या स्वतः स्वतःला खरा पेलेवू असे समजतात, पण त्यांनी विचारलेला हा प्रश्न खरंच विचार केला, तर सार्वत्रिक आहे.

कोण आहोत आपण? काय अस्तित्व आहे आपले? आपण खरंच असामान्य आहोत का? मित्रानो, असे नसून, आपण उगीच आपल्याला मोठे किंवा इतरांपासून वेगळे समजतो, हे विनाकारण स्वयंघोषित मोठेपण आणि वेगळेपण आपले खूप मोठे नुकसान करत असल्याची जाणीव आपल्या लेखी सुद्धा नसते. स्वला मोठे किंवा कुणीतरी वेगळे समजून, आपण नाते नावाच्या बागेतील इतर फुलांपासून दूर जात असतो, यात आपला अहंकार आपल्याला आंधळे करून सोडतो व आपण वास्तवापासून खूप दूर जात, स्वला वेगळे व मोठे समजण्याच्या अविर्भावात जगत असतो.

इमिली तिच्या कवितेत सामान्य माणसाला nobody म्हणते व असामान्य माणसाला somebody म्हणत ती आपल्या सगळ्यांना nobody या वर्गात राहायला सांगते. कारण आपण यशाच्या आकाशात कितीही उंच भरारी घेतली, तरी तिच्या मते आपण आपले पाय जमिनीवर ठेवून अतिशय विनम्रपणे सामान्य माणसांप्रमाणे, सामान्य माणसात मिसळून जीवन जगायला पाहिजे. आपण ज्या सामान्य पायरीचा आधार घेऊन यशाच्या उंच शिखरावर जातो त्या सामान्य पायरीला आपण केव्हाच विसरता कामा नये. थोडक्यात काय, तर आपण सगळे nobody म्हणजेच सामान्य असतो, पण दुर्दैवाने आपण असामान्यासारखे वागतो आणि इथेच आपली फसगत होते व आपण आपल्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या माणसांपासून दुरावत जातो. पण जर आपण आपल्या जगण्याकडे वास्तवाचा चष्मा लावून बघितले, तर आपल्या लक्ष्यात येईन की, आपण कुणीच नाहीत, तर एक अतिशय सामान्य माणूस असून, आपल्या नसण्याने कुठेच कुणाचेच काहीच अडत नाही. प्रसिद्ध कवी, भा. रा. तांबे त्यांच्या कवितेत सांगतात,



जन पळभर म्हणतील हाय हाय,
मी जाता उरेल ते कार्य

काय? काय सांगतात ह्या ओळी आपणाला, की आपण उद्या असू अथवा नसू, तरीही सूर्य, चंद्र, पृथ्वी व ही सर्व चराचर सृष्टी अविरत चालू असणार आहे, हे जर असे असेल, तर मग आपण कोण आहोत? उगीच रुसून, फुगून, आडून बसल्याने आपण मोठे होतो का? मोठे व्यक्ती मोठ्या पदाला कशी जातात? आपला इतिहास आपल्याला सांगतो, की जेवढे म्हणून काही लोक मोठ्या पदाला गेली, ती सर्व नम्र होती. त्यांच्या स्वभावात अहंकार, द्वेष, तिरस्कार नव्हता व सर्वात मोठी गोष्ट म्हणजे ते स्वला सामान्य समजायचे.

असामान्य कार्य करणारी माणसे, स्वला सामान्य समजतात, म्हणजेच इमिलीच्या कवितेमध्ये इमिली त्यांना पेलेवू म्हणते. स्वतःला मोठी समजणारी माणसे खरंच मोठी असतात का, हा सुद्धा एक विचार करायला लावणारा प्रश्न असून, बहुदा अशी माणसे केवळ श्रीमंतीने मोठी पण मनाच्या श्रीमंतीने आखूड असलेली दिसतात. सूर्याला जेवढे अस्तित्व असते तेवढेच अस्तित्व काजव्याला सुद्धा असते. त्यामुळे केवळ सूर्य मोठा आणि काजवा लहान असे होत नाही.

इमिलीच्या मतानुसार खरे सुख आणि आनंद मोठेपणा मिरवण्यात नसून लहानपणात आहे. कुठलेही मधुर फळ असलेले झाड तेवढेच खाली वाकलेले दिसते, याचा अर्थ खऱ्या अर्थाने मोठी किंवा मोठेपणाला गेलेली माणसे ही विनम्र असल्याचे अनेक दाखले आपला इतिहास आपणाला देतो, पण दुर्दैवाने आपण ती गोष्ट आज भौतिक काळात जीवन जगताना विसरून गेलेलो दिसतो व आपण कुणीतरी असामान्य व्यक्ती आहोत या फसव्या भ्रमात आपण जीवन जगतो, हा अर्थशून्य मोठेपणाचा फसवा भोपळा मग आपला वास्तवाशी संपर्क आला, की फुटून जातो व मग केवळ पश्चाताप आपल्या हातात उरत असतो. म्हणून माणसाला असमान्यातही सामान्य–प्रमाणे जगत जगत, आपल्या असामान्य कार्याचा सुगंध सगळीकडे पसरवता आला पाहिजे, हेच इमिलीला सांगायचे असेल कदाचित.

–प्रा. अमित शिंदे
रोही पिंपळगाव,
ता. मुदखेड, जि. नांदेड
मो. ९७६७८५१०४६

# कृषीनिष्ठ संशोधकाची यशस्वी कहाणी: देह वेचावा कारणी

पुस्तक परीक्षण
प्रा. डॉ. व्यंकटी पावडे
मराठी विभाग प्रमुख
केआरएम महिला महाविद्यालय,
नांदेड मो. ९६५७२७८२१७




शेती, शेतकरी, गावशिवार व तेथील सुखदुःखांशी एकरूप झालेले संशोधक व्यक्तिमत्व म्हणजे कृषिभूषण डॉ. उत्तमराव इंगळे हे होत. त्यांचा 'देह वेचावा कारणी' हा आत्मचरित्रपर ग्रंथ नांदेड येथील निर्मल प्रकाशनाने सिद्ध केला आहे. या ग्रंथास विजयकुमार चित्तरवाड यांनी बोलके मुखपृष्ठ तयार केले असून लेखक जगदीश कदम यांनी ग्रंथाच्या अर्क काढणारे अभ्यासपूर्ण मलपृष्ठ लिहिले आहे. डॉ. उत्तमराव इंगळे यांनी स्वतःचे बालपण, जडणघडण, शिक्षण, संशोधन विविध अभ्यासदौरे आणि कृषी क्षेत्रातील अतुलनीय केलेल्या कार्याचा धांडोळा या आत्मचरित्रामध्ये नेमकेपणाने घेतला आहे. २०८ पृष्ठांचा हा ग्रंथ वाचकांना ऊर्जा व प्रेरणा देणारा आहे. मनात कोणताही आडपडदा न ठेवता हळव्या कोपऱ्यातील भावभावनांचा निचरा या ग्रंथात त्यांनी स्पष्ट केला आहे. नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुका येथील उमरी या खेडेगावात त्यांचा सधन शेतकरी कुटुंबामध्ये जन्म झाला. प्रखर देशभक्ती व आर्यसमाजाच्या विचाराने प्रभावित झालेले हे कुटुंब होते. खेळ, व्यायाम, शिस्त आणि शिक्षण या गोष्टींचे महत्त्व त्यांना बालपणीच त्यांच्या काकांनी समजावून दिले,त्यामुळे डॉ. उत्तमराव इंगळे यांच्या आयुष्याला एक वेगळे समर्पणवृत्तीचे वळण लागले. कुस्ती, मलखांब, मैदानी खेळ, पोहणे आणि वाचन या गोष्टी त्यांना खूप आवडत होत्या त्याचे कारण त्यांच्या मनावर बालपणी सुयोग्य संस्कार झाले.

कुटुंब, शाळा, शिक्षक जर संस्कार करणारे लाभले तर आयुष्य घडते, अन्यथा आयुष्याला वेगळे वळण लागते. डॉ. उत्तमराव इंगळे यांना बालणी वडील काका काकू आजी आजोबा या संयुक्त कुटुंबाचा सहवास लाभला. ते संपूर्ण आयुष्य थोर माणसांच्या सहवासात राहिले. माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण, पद्मश्री शामराव कदम, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख या राजकीय नेते मंडळीसह नरहर कुरुंदकर, दे. ल. महाजन या शिक्षकांसह कुलगुरू डॉ. दत्ताजीराव साळुंखे व डॉ. स्वामीनाथन या शिक्षण महर्षी व साहित्यिक व्यक्तिमत्त्वांचा सहवास लाभला त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व ध्येयवादी, समाजसेवावृत्तीचे, समर्पणशील आणि प्रगल्भ बनले. अत्यंत परिश्रमाने त्यांनी शिक्षण घेतले. घरात श्रीमंती असूनही नांदेड येथे मराठा विद्यार्थ्यांच्या बोर्डिंगमध्ये राहुन प्रतिभा निकेतन या शाळेत स्वतःचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. बी



एस्सी १९६४, एम एस्सी (कृषी) १९६६, पीएचडी १९७० मध्ये त्यांनी पूर्ण केली. वेगवेगळ्या ठिकाणी अभ्यास दौरे करून ज्ञान संकलन केले आणि मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी या विद्यापीठास एक वेगळा चेहरा प्राप्त करून दिला.

शेती तेथील प्रश्न समस्या यांची अनुभवातून जाण असल्यामुळे शेतीसाठी शेतकऱ्यांना काय हवे याची संपूर्ण माहिती त्यांना होती, म्हणून त्यांनी शेती प्रश्नांची निगडित अनेक बाबींवर संशोधन केले. करणाल हरियाणा या ठिकाणी जाऊन पीएच. डी. पूर्ण केली. काश्मीर येथे डॉ. कचरू व डॉ. टीक्का यांच्या समवेत निसर्गाचा अभ्यास केला. सिमला, फिलिपाईन्स, रशिया इत्यादी अनेक ठिकाणी भेटी देऊन तेथील शेती संशोधनाचा अभ्यास केला. अमेरिका व इजिप्त व इतर देशातील पाणलोट क्षेत्रांची माहिती घेऊन आपल्या देशातील भौगोलिक क्षेत्रानुसार कोणता बदल करावा व शेतीचे भवितव्य कसे सुधारावे यासाठी शासनाकडे अहवाल सादर केला. युवक शेतकऱ्यांना शिक्षण व उद्योगाचे प्रशिक्षण दिले. मोसंबी, द्राक्ष, गहू, कापूस इत्यादी पिकांची लागवड अत्याधुनिक पद्धतीने कशी करावी व अधिक उत्पादन कसे मिळवावे त्याचे व्यवस्थापन कसे करावे यासाठी गावोगावी शेतकरी मेळावे घेऊन उत्पादनांमध्ये वाढ करण्यासाठी प्रयत्न केले.

प्राध्यापक, सहयोगी अधिष्ठाता, प्राचार्य व शिक्षण विस्तार संचालक ही सन्मानाची पदे भूषविताना कुठेही अहंकाराचा, मी पणाचा वारा न लागू देता त्यांनी सतत लोकोपयोगी कामे केली. विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, शेतकऱ्यांचा कैवारी समाजभान बाळगून केलेले संशोधन त्यांच्या व्यासंगी व्यक्तिमत्त्वाची जाणीव करून देणारे आहे. त्यांनी शेती प्रश्नांची चर्चा करणारे शेतकरी मेळावे, परिसंवाद, चर्चासत्र घेतली. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्याशी संवाद साधला व तेथील समस्या जाणून घेतल्या.

कुटुंब, नातीगोती, नोकरीचे व्यवस्थापन, मित्रपरिवार, शेतकरी या सर्वांना त्यांनी आपल्या आयुष्यात महत्त्व दिले. स्वतःच्या आयुष्यातील प्रत्येक क्षण त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सत्कारणी लावला. मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी या विद्यापीठास स्वतःच्या संशोधनातून त्यांनी देशभर एक वेगळी ओळख दिली. डॉ. उत्तमराव इंगळे यांनी कृषी क्षेत्राशी संबंधित असलेल्या विविध समित्यांवर केलेले कार्य कौतुकास्पद आहे. विद्यापीठाचा परिसर हिरवा व स्वतःचे चारित्र्य स्वच्छ ठेवले. शेतकऱ्यांच्या मुलाच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यास अधिक प्राधान्य दिले. 'देह वेचावा कारणी' या आत्मचरित्रातून त्यांच्या समर्पनशील व्यक्तिमत्त्वाची ओळख पटते. मराठी आत्मचरित्र परंपरेत या आत्मचरित्राने महत्त्वाची भर घातली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना समजेल उमजेल अशा सहज व सोप्या भाषेतून आयुष्यातील विविध प्रसंग त्यांनी उलगडून दाखविले आहेत. हे आत्मचरित्र वाचताना वाचकास त्यांच्या जिद्द, साहस, धाडसी वृत्ती आणि अथक परिश्रम या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये जाणवतात. सत्यकथन हे या आत्मचरित्राचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. एका सामान्य शेतकऱ्याच्या मुलाचा हा जागतिक कीर्तीचा प्रवास नवा आदर्श घडविणारा आणि इतरांना प्रेरणा देणारा आहे, म्हणून मराठीतील सर्व वाचक, रसिक, संशोधक आणि शेतकरी यांनी हा त्यांचा आदर्शवादी जीवनप्रवास वाचावा ही अपेक्षा. अशा या प्रेमळ, कृषीनिष्ठ व संशोधक माणसांचा २५ जून हा वाढदिवस. त्यानिमित्त त्यांना निरोगी आरोग्य व दीर्घायुष्य लाभो हीच निर्मिकाकडे मनोमन प्रार्थना. शेवटी आयुष्याचा अर्थ सांगताना एका कवीच्या भाषेत एवढेच म्हणावे वाटते.

कई शिर जन्म लेते है
कुछ करने के लिए
और कई शिर जन्म लेते है
सिर्फ मरने के लिए

म्हणून देशाच्या इतिहासात आपण काहीतरी लोकोत्तर कार्य करावे हीच अपेक्षा.

**संदर्भ: देह वेचावा कारणी,**
**कृषिभूषण डॉ. उत्तमराव इंगळे,**
**निर्मल प्रकाशन नांदेड,**
**प्रथमआवृत्ती ऑगस्ट २०२३,**
**पृष्ठ २०८,**
**मूल्य ३५०.**

# स्टॉप डायरिया अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ; शुद्ध पाणीपुरवठा व स्वच्छतेवर भर

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या वतीने स्टॉप डायरिया अभियान या विशेष मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ बुधवारी दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आला. जलजन्य आजारांचा प्रसार रोखण्यासाठी ग्रामपंचायतींनी विशेष खबरदारी घेऊन गावपातळीवर शुद्ध पाणी-पुरवठा, पाणी गुणवत्तेची नियमित तपासणी आणि स्वच्छता राखावी, असे आवाहन जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड यांनी केले.




यावेळी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. बी. एन. संगनवार तसेच जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार कपेंद्र देसाई उपस्थित होते.

स्वच्छ जल, समुचित स्वच्छता – डायरियापासून बचावाची खात्री हे अभियानाचे ब्रीदवाक्य असून, ही मोहीम १६ जून ते ३१ जुलै या कालावधीत जिल्हाभर प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. अभियानाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत, आरोग्य पर्यवेक्षक, उपअभियंते, कनिष्ठ अभियंते, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, तालुका गट समन्वयक व तालुका समूह समन्वयक यांच्यासाठी ऑनलाईन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

अभियान तीन टप्प्यांत राबविण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात गावातील पाणीपुरवठा योजनांची पाहणी, पाईपलाईन, गळती दुरुस्ती, ग्रामसभा व बैठकींच्या माध्यमातून जनजागृती, पाणी गुणवत्ता तपासणी, गृहभेटी, वैयक्तिक स्वच्छता व साबणाने हात धुण्याबाबत मार्गदर्शन यावर भर दिला जाणार आहे.

दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, पाणी स्रोतांची तपासणी, घरगुती नळजोडण्यांची स्थिती, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, मैलागाळ व्यवस्थापन, तसेच हागणदारीमुक्त व शाश्वत स्वच्छ गाव संकल्पना बळकट करण्यासाठी विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

कार्यक्रमादरम्यान जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार कपेंद्र देसाई यांनी अभियानाची उद्दिष्टे, अंमलबजावणीची कार्यपद्धती आणि विविध विभागांच्या जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डायरिया व इतर जलजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी सर्व ग्रामपंचायती, आरोग्य विभाग आणि पाणीपुरवठा यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## विशेष तिकीट तपासणी मोहिमेत ५४३ प्रकरणे निष्पन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– विना-तिकीट प्रवासाला आळा घालणे आणि रेल्वेच्या महसुलाचे संरक्षण करणे या उद्देशाने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात दि. १९ जून २०२६ रोजी सकाळी ६ ते सायंकाळी २० या कालावधीत विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेवर नांदेडचे सहायक वाणिज्य व्यवस्थापक शैलेश कुमारसिंह यांनी देखरेख ठेवली. विभागातील सर्व पथकांमधील एकूण २७ तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी या व्यापक मोहिमेत सहभाग घेतला. मोहिमेदरम्यान विभागातील २६ रेल्वेगाड्यांमध्ये तपासणी करण्यात आली.

या तपासणीदरम्यान विना-तिकीट प्रवास, अनियमित प्रवास तसेच बुक न केलेल्या सामानासंदर्भातील एकूण ५४३ प्रकरणे आढळून आली. त्यातून भाडे, दंड आणि इतर शुल्काच्या स्वरूपात एकूण ३ लाख ८० हजार ५५० इतका महसूल वसूल करण्यात आला.

५४३ प्रकरणांमधून प्राप्त झालेला हा महसूल रेल्वे प्रवास नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी तसेच रेल्वेच्या उत्पन्नाचे संरक्षण करण्यासाठी नांदेड विभागाच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे.

# देगलूर-कर्नाटक सीमा मार्गासाठी बजेट मंजूर

## नांदेड-बिदर महामार्गाच्या उन्नतीकरणाला वेग -खा. डॉ. अजित गोपछडे



**नांदेड (प्रतिनिधी)**– देगलूर ते कर्नाटक राज्यसीमा या महत्त्वपूर्ण मार्गाच्या विकासासाठी बजेट मंजुरी प्राप्त झाल्यानंतर नांदेड - बिदर महामार्गाच्या उन्नतीकरणाला नवे बळ मिळाले आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पुढील टप्प्यात राज्यसभा खा. डॉ. अजित गोपछडे यांनी सोमवार, दि. २२ जून रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेऊन या विकासकार्याच्या संकल्पनेवर आधारित विशेष स्मृतिचित्र भेट देत त्यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचीही भेट घेऊन या विकासकार्याशी संबंधित विशेष स्मृतिचित्र प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. या महत्त्वपूर्ण प्रकल्पाला गती मिळवून देण्यासाठी दिलेल्या सहकार्याबद्दल खा. डॉ. गोपछडे यांनी त्यांचे आभार मानले.

या प्रकल्पांतर्गत देगलूर - करडखेड - मरखेल-हाणेगाव ते कर्नाटक राज्यसीमा या मार्गाचा दर्जेदार विकास करण्यात येणार असून, नांदेड-बिदर महामार्गावरील सुमारे २० किलोमीटरचा अत्यंत जीर्ण व दयनीय अवस्थेतील भाग प्रथमच आधुनिक महामार्गाच्या दर्जानुसार विकसित करण्यात येणार आहे. गत ५० वर्षांपासून या मार्गावर सर्वसमावेशक आणि उच्च दर्जाचे काम झाले नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता हा मार्ग नव्या स्वरूपात विकसित होऊन अधिक सुरक्षित, सुलभ आणि वेगवान प्रवासाचा अनुभव देणार आहे.

तख्त सचखंड श्री हजूर साहिब, नांदेड ते गुरुद्वारा श्री नानक झिरा साहिब, बिदर या दोन महत्त्वाच्या शीख तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या या मार्गाला धार्मिक, सांस्कृतिक तसेच आर्थिक दृष्टिकोनातून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. देश-विदेशातून दर्शनासाठी येणारे लाखो शीख भाविक, पर्यटक तसेच नांदेड-बिदर मार्गावर नियमित प्रवास करणारे विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना या प्रकल्पाचा मोठा लाभ होणार आहे. सीमावर्ती भागातील व्यापार, पर्यटन आणि सर्वांगीण विकासालाही या प्रकल्पामुळे नवी चालना मिळणार आहे.

खा. डॉ. गोपछडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे एशियन डेव्हलपमेंट बँक सहाय्यित योजनेअंतर्गत या मार्गासाठी आवश्यक निधीला मंजुरी मिळाली असून, लवकरच प्रत्यक्ष कामांना प्रारंभ होणार आहे. परिणामी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागाच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून, नांदेड-बिदर महामार्ग भविष्यात आधुनिक, सुरक्षित आणि प्रवाशांना सुखद अनुभव देणारा दर्जेदार मार्ग म्हणून विकसित होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# किनवटमध्ये वीज पुरवठ्याचा खेळखंडोबा

**किनवट (प्रतिनिधी)** –महावितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे शहरात गेल्या अनेक दिवसांपासून वीज पुरवठ्याचा खेळखंडोबा सुरू आहे. दिवसभरातून अनेक वेळा वीज पुरवठा खंडित करण्यात येत असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.

किनवट शहर व गोकुंद्यात गेल्या अनेक दिवसांपासून वीज पुरवठा सुरळीत नसल्याने वीज ग्राहक वैतागले आहेत. दर अर्ध्या तासात एक-दोनदा वीज पुरवठा खंडित होत आहे. वादळ-वारे किंवा पाऊस नसतानाही वीज पुरवठा खंडित होत आहे. वीज पुरवठा खंडित होताच फ्यूज कॉल सेंटरचा भ्रमणध्वनीही खंडित केला जातो. अधिकारी तसेच संबंधित डीपीचे लाईनमन वीज ग्राहकांचे फोन घेत नाहीत. यामुळे वीज ग्राहकांत संताप व्यक्त केला जात आहे. वीज ग्राहकांचे समाधान न करणाऱ्या कर्मचाऱ्यांची येथून उचलबांगडी करण्याची मागणी ग्राहकांतून होत आहे. महावितरणच्या गलथान कारभाराला वैतागून आ. भीमराव केराम यांनी महावितरणच्या विरोधात विधानसभेत आवाज उठविण्याचा इशारा दिला होता. त्यानंतरही महावितरणच्या गलथान कारभारात सुधारणा झाली नाही. सोमवारी रात्रीच्या पहिल्याच पावसानंतर शहरासह गोकुंदात वीज पुरवठा खंडित झाला. काही भागांत तब्बल १२ तासानंतर वीज पुरवठा सुरू झाला. पावसाळ्यापूर्वी झाडे तोडणी, वायर बदलणे अशी कामे हाती न घेता महावितरणने सोमवारी रात्रीच्या पावसानंतर मंगळवारी वरील कामे हाती घेऊन आपल्या गलथान कारभाराचा नमुना दाखवून दिला. लोकप्रतिनिधींच्या इशाऱ्यानंतरही आपल्या कारभारात सुधारणा न करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

# मौजे पांढरवाडी येथे धरती माता बचाव अभियान व अल निनोच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामपूर्व बैठक



**मुदखेड (प्रतिनिधी)**– ८० ते १०० मिमी पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन मुदखेडचे तालुका कृषी अधिकारी यांनी एका बैठकीत केले. कृषी विभागाच्या सल्ल्यानुसारच पेरणी करावी. अंदाजे ६ इंच पाणी मातीत मुरल्यानंतरच पेरणी करावी असेही सांगितले.

मौजे पांढरवाडी येथे धरती माता बचाव अभियान तसेच आगामी अल निनोच्या पार्श्वभूमीवर मा. तालुका कृषी अधिकारी डॉ. अमरज्योती गच्चे यांनी एल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामाचे योग्य नियोजन करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी, बीज प्रक्रिया, बीबीएफ तंत्रज्ञान, टोकण पद्धतीने सोयाबीन लागवडीमध्ये बियाणे बचत. उताराला आडवी पेरणी, तसेच पारंपरिक सोयाबीन लागवडीमध्ये सऱ्या पाडल्याने होणारे फायदे याविषयी माहिती दिली. याशिवाय पाणी मुरविणे, पाणी जिरविणे आणि पाणी झिरपविणे या जलसंधारण उपाययोजनांचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी त्यांनी सापळा पिकांचा वापर, खतांचा संतुलित व गरजेनुसार वापर, डीएपीला पर्यायी खतांचे पर्याय, नॅनो युरिया व नॅनो डीएपीचा प्रभावी वापर तसेच महाविस्तार एआय ॲपच्या सुविधांविषयी शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली.

## महाराष्ट्र योग शिक्षक संघातर्फे योग दिन उत्साहात साजरा

**नांदेड़ (प्रतिनिधी)**– जागतिक योग दिवस महाराष्ट्र योग शिक्षक संघ व योग विद्याधाम, एमजीएम महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी योग पंडित संजय पवार उपाध्यक्ष योग विद्या धाम यांनी उपस्थिताना आपले अनमोल मार्गदर्शन केले. तसेच योग आसन, प्राणायम, ध्यान याबद्दल सविस्तर माहिती दिली. योगाचे महत्त्व सांगून त्यांच्याकडून योग करून घेतले.

यावेळी संस्थेतर्फे उपस्थित प्रमुख पाहुण्यांचा शाल व वृक्ष देऊन अनिकेत भोरे व मनोज राठोड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी योग शिक्षक आनंद देशमुख यांनी योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योग शिक्षक तथा महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुन शिंदे यांनी केले.

योगा हा मानवाच्या जीवनात किती महत्वाचा आहे याबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमासाठी कॉलेजचे विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम संचालिका डॉ. गीता लठकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी पार पडला. तसेच प्रियदर्शनी शाळेत, योग शिक्षिका सौ. संगीता योगेश वडजे यांचा सत्कार माधसवाड यांनी करून योग वर्गास शुभेच्छा दिल्या.

# ग्राहकांची संमती घेतल्याशिवाय स्मार्ट वीज मीटर बसवू नयेत

## अखिल भारतीय ग्राहक पंचायतची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात ग्राहकांची संमती घेतल्याशिवाय स्मार्ट वीज मीटर बसवू नयेत, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतने जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

स्मार्ट वीज मीटर बसविण्याच्या प्रक्रियेला सध्या वेग आला असताना ग्राहकांची पूर्वसंमती न घेता आणि पुरेशी माहिती न देता मीटर बसविण्यात येत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. अखिल भारतीय ग्राहक पंचायत, नांदेड जिल्हा शाखेने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून ही प्रक्रिया तत्काळ स्थगित करण्याची मागणी केली आहे.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष रमेश मस्के आणि जिल्हा सचिव संतोष कुलकर्णी यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील विविध भागांमध्ये पारंपरिक वीज मीटरच्या जागी स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम सुरू आहे. मात्र, अनेक ठिकाणी ग्राहकांना याबाबत पूर्वकल्पना न देता, तसेच त्यांच्यामध्ये आवश्यक जनजागृती न करता स्मार्ट मीटर बसविण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम आणि अस्वस्थता निर्माण झाली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, स्मार्ट मीटरमुळे होणारे फायदे, संभाव्य तोटे, बील आकारणीची पद्धत, प्रीपेड प्रणालीचे परिणाम, तांत्रिक अडचणी आणि ग्राहकांचे अधिकार याबाबत अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. अशा परिस्थितीत ग्राहकांची स्पष्ट संमती न घेता स्मार्ट मीटर बसविणे हे ग्राहक हक्कांचे उल्लंघन ठरू शकते, असा इशारा ग्राहक पंचायतीने दिला आहे.

ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने कोणतीही नवी यंत्रणा किंवा तंत्रज्ञान लागू करण्यापूर्वी संबंधित ग्राहकांना संपूर्ण माहिती देणे, त्यांच्या शंकांचे निरसन करणे आणि आवश्यक ती संमती घेणे गरजेचे असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# आंबेडकरवादी मिशनची उद्या प्रवेशपूर्व परीक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील आंबेडकरवादी मिशनमध्ये यूपीएससी एमपीएससी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाला प्रवेश देण्यासाठी राज्यस्तरीय प्रवेशपूर्व परीक्षेचे आयोजन २६ जून रोजी करण्यात आले आहे.

सिडको नांदेड येथील आंबेडकरवादी मिशनच्या मुख्यालयात ही परीक्षा सकाळी ११ वाजता होणार आहे. कोणतीही नोंदणी न करता विद्यार्थी सरळ पूर्वपरीक्षेसाठी येऊ शकतील. या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सहा महिन्यासाठी एमपीएससी परीक्षेच्या तयारीसाठी दिल्ली येथील नामवंत Next ias class च्या लाखो रुपयांच्या फीची मार्गदर्शन सुविधा नि:शुल्क देण्यात येणार आहे. सोबतच एमपीएससीसाठी मार्गदर्शन वर्ग, अभ्यासिका, ग्रंथालय, टेस्ट सिरीस सुविधा देण्यात येतील. वसतिगृह व मेससाठी आत्यंतिक नाममात्र शुल्क आकारले जातील. १२ वी पास विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा विशेष बॅच असेल. सर्व जाती-धर्मातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश दिला जातो.

आंबेडकरवादी मिशनच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाचा होतकरू विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी केले आहे.

# टाकळीकर पाटील कुटुंबाची दुहेरी यशोगाथा; संस्कारला एमएचटी-सीईटीमध्ये ९९.४० टक्के

## साक्षी पाटील हिचे शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय यश

**नांदेड (प्रतिनिधी)**– गुणवत्तेची परंपरा आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर पाटील कुटुंबातील संस्कार संजय पाटील आणि साक्षी संजय पाटील यांनी शैक्षणिक तसेच व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



बरबडा येथील जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाचा विद्यार्थी संस्कार संजय पाटील याने एमएचटी-सीईटी (पीसीएम गट) परीक्षेत तब्बल ९९.४० टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश प्राप्त केल आहे. यापूर्वी त्याने बारावीच्या बोर्ड परीक्षेत ९६ टक्के गुण मिळविले होते. तसेच दहावीची परीक्षा किड्स किंग्डम सीबीएसई स्कूलमधून ९७ टक्के गुणांसह उत्तीर्ण होत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली होती.

संस्कारची बहीण साक्षी संजय पाटील हिने देखील शैक्षणिक क्षेत्रात उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. तिने जेईई परीक्षेत ९९.७६ गुण मिळविले. त्यानंतर भारतातील नामांकित स्कूल ऑफ प्लॅनिंग अँड आर्किटेक्चर (एसपीए) भोपाळ येथून बी.आर्क. पदवी शिक्षणादरम्यान ९.९ सीजीपीए प्राप्त करत गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. सध्या ती पुण्यातील एका नामांकित कंपनीमध्ये आर्किटेक्ट म्हणून कार्यरत असून, तिच्या उत्कृष्ट प्रकल्पांमुळे अल्पावधीतच तिला माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या निवासस्थानाच्या वास्तुरचनेचे तसेच दीपक फर्टिलायझर्सच्या प्रकल्पांशी संबंधित वास्तुरचना करण्याची संधी मिळाली आहे.

संस्कार आणि साक्षी यांच्या यशाबद्दल माजी शिक्षण राज्यमंत्री डी. पी. सावंत, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद पाटील बोंढारकर, आ. अमर राजूरकर, माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर, मोहन पाटील टाकळीकर, मार्गव अकॅडमीचे भार्गव राजे, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

## वीज कोसळून कडब्याची गंजी जळून खाक



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – तालुक्यातील मांजरम वाडी शिवारात मंगळवारी पहाटे झालेल्या वादळी पावसादरम्यान वीज कोसळून शेतकरी मारुती माणिकराव छपरे यांच्या शेतातील कडब्याची गंजी जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

या दुर्घटनेत जनावरांच्या चाऱ्याचा मोठा साठा नष्ट झाल्याने संबंधित शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, शासनाकडून तातडीने मदत मिळावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांसह शेतकरी करीत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार मंगळवारी पहाटे सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास परिसरात वादळी-वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि विजांचा कडकडाट सुरू होता. याच दरम्यान अचानक वीज थेट मारुती छपरे यांच्या शेतातील कडब्याच्या गंजीवर कोसळली. विजेच्या धक्क्यामुळे गंजीने काही क्षणांत पेट घेतला आणि आगीने भीषण स्वरूप धारण केले.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र या आगीत कडबा जळून खाक झाला. ग्रामस्थांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आली, परंतु तोपर्यंत हजारो रुपयांचा चाऱ्याचा साठा जळून राख झाला होता.

# पीआय चिंचोलकरांकडून केवळ २० महिन्यांत ६७ कोटींचा मुद्देमाल जप्त; १४११ टक्के वाढ

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी ठाण्याचा पदभार घेतल्यापासून केवळ २० महिन्यांत ६७ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे त्यांनी चार वाळू माफीयांना एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध केले आहे. अजूनही काही प्रस्ताव तयारीत असून मागील दहा वर्षापासून या पोलीस ठाण्याचा रेकॉर्ड त्यांनी मोडीत काढला आहे.

पोलीस ठाण्याच्या १० वर्षांच्या कामगिरी विरूद्ध २० महिन्यांचा त्यांचा झंझावात अवैध धंदे चालकांना दिवसा तारे दाखवणारा ठरला. सन २०१५ ते २०२४ या तब्बल १० वर्षांच्या प्रदीर्घ काळात नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात अवैध वाळू उपसा आणि गौण खनिजाच्या वाहतुकीबाबत एकूण ५९ गुन्हे दाखल झाले होते. या १० वर्षांत एकूण ४ कोटी ७५ लाख ७२ हजार ५३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. परंतु पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पदभार स्वीकारल्यापासून अवघ्या २० महिन्यांच्या कालावधीत गुन्हेगारांवर असा काही वचक निर्माण केला की, त्यांनी तब्बल १५२ गुन्हे दाखल करून ६७ कोटी १३ लाख ८२ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



### कारवायांमध्ये मोठी वाढ

पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची टक्केवारी पाहिली तर पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर कौतुकाचा वर्षाव होत आह.

**गुन्ह्यांमध्ये २५७ टक्केची वाढ:** मागील १० वर्षांत झालेल्या एकूण गुन्ह्यांच्या तुलनेत चिंचोलकर यांच्या २० महिन्यांच्या काळात तब्बल २५७ टक्के जास्त गुन्हे दाखल करून वाळू चोरांना गजाआड करण्यात आले.

मुद्देमालात १४११ टक्केची प्रचंड वाढ झाली आहे. १० वर्षांत जेमतेम पावणेपाच कोटींचा मुद्देमाल जप्त झाला होता, तिथे चिंचोलकर यांनी आपल्या धडक मोहिमेद्वारे तब्बल १४११ टक्क्यांची वाढ नोंदवत ६७ कोटींपेक्षा अधिकचा मुद्देमाल जप्त केला. हा आकडा मागील १० वर्षांच्या तुलनेत चौदा पटीहून अधिक आहे.

शासकीय महसुलाची चोरी करणाऱ्या आणि पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या माफियांच्या मुसक्या आवळण्यासाठी पो. नि. ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या वरिष्ठ आणि कनिष्ठ अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दाखवलेले धाडस आणि त्यांचे अचूक नियोजन हे पोलीस दलाची मान उंचावणारे ठरले आहे. रात्री-अपरात्री होणारी अवैध वाहतूक रोखण्यासाठी त्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून कारवाया केल्या.

नांदेड ग्रामीण हद्दीत कोणत्याही प्रकारचा अवैध धंदा, रेती चोरी किंवा गौण खनिजाची अवैध वाहतूक खपवून घेतली जाणार नाही. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कडक आणि कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाईल, असा इशारा नांदेड ग्रामीण पोलिसांनी दिला आहे.

## दुष्काळी परिस्थितीत चारा उत्पादनास चालना; पशुपालकांना वैरण बियाण्यांचे वाटप

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२६-२०२७ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या चारा उत्पादन योजनेच्या माध्यमातून पशुपालकांना प्रातिनिधिक स्वरूपात वैरण बियाण्यांचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमास जिल्हा नियोजन अधिकारी, नांदेड, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तसेच पशुधन विकास अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी पुरेशा चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी चारा उत्पादनाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच पशुपालकांनी मुरघास (सायलेज) निर्मिती व वापराला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले.

याशिवाय मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना अंतर्गत उपलब्ध सुविधांचा लाभ घेऊन जास्तीत जास्त पशुपालक शेतकऱ्यांनी पशुपालन व्यवसाय अधिक सक्षम व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमात उपस्थित पशुपालकांना चारा उत्पादन व पशुधन व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## Annexure I — Form A

## Balance Sheet of GODAVARI URBAN CO-OPERATIVE BANK LTD. VAZIRABAD, NANDED

### FORM OF BALANCE AS ON 31ST MARCH, 2026

| Particulars | Schedule | As on 31-3-2026 (Current Year) | As on 31-3-2025 (Previous Year) |
|---|---|---|---|
| **CAPITAL AND LIABILITIES** | | | |
| Capital | 1 | 15634200.00 | 14912900.00 |
| Reserves and Surplus | 2 | 54484068.65 | 53059472.51 |
| Deposits | 3 | 344864366.81 | 340845351.00 |
| Borrowings | 4 | 0.00 | 0.00 |
| Other liabilities and provisions | 5 | 37641426.50 | 53155862.09 |
| **Total Capital And Liabilities** | | **452624061.96** | **461973585.60** |
| **ASSETS** | | | |
| Cash | 6 | 5178756.00 | 4398618.00 |
| and Balances with Reserve Bank of India Balance | | 0.00 | 0.00 |
| with banks and money at call and short notice | 7 | 53441459.73 | 53089994.94 |
| Investments | 8 | 182707350.05 | 196510500.05 |
| Advances | 9 | 173263570.62 | 172529246.02 |
| Fixed Assets | 10 | 19580997.25 | 19425797.25 |
| Other Assets | 11 | 18451928.31 | 16019429.34 |
| **Total Assets** | | **452624061.96** | **461973585.60** |
| Contingent liabilities | 12 | 2849762.18 | 2808871.18 |

## Annexure I — Form B

## Profit & Loss A/c of GODAVARI URBAN CO-OPERATIVE BANK LTD. VAZIRABAD, NANDED

### Form of Profit and Loss Account for the year ended on 31st March, 2026

| | Particulars | Schedule | As on 31-3-2026 (Current Year) | As on 31-3-2025 (Previous Year) |
|---|---|---|---|---|
| I. | **Income** | | | |
| | Interest earned | 13 | 42296609.83 | 42792743.46 |
| | Other income | 14 | 2841100.97 | 2982257.40 |
| | **Total Income** | | **45137710.80** | **45775000.86** |
| II. | **Expenditure** | | | |
| | Interest expended | 15 | 36282938.00 | 35996224.00 |
| | Operating expenses | 16 | 7330272.50 | 7684533.30 |
| | Provisions and contingencies | | 83548.00 | 778657.00 |
| | **Total Expenditure** | | **43696758.50** | **44459414.30** |
| III. | **Profit/Loss** | | | |
| | Net profit/loss(-) for the year | | 1440952.30 | 1315586.56 |
| | Profit/Loss(-) brought forward | | 0.00 | 0.00 |
| | **Total Profit / Loss** | | **1440952.30** | **1315586.56** |
| IV. | **Appropriations** | | | |
| | Transfer to Statutory Reserves | | **0.00** | **0.00** |
| | Transfer to Other Reserves | | **0.00** | **0.00** |
| | Transfer to Proposed Dividend 5% | | **0.00** | **0.00** |
| | Transfer to Government (Income Tax) | | **0.00** | **0.00** |
| | **Balance carried over to Balance Sheet** | | **0.00** | **0.00** |
| | **Total** | | **0.00** | **0.00** |

*** Proposed Dividend accounting year for 2025-2026 subject to Annual General Body Meeting approval**

| Chairman | Director | Director | C.E.O. | Manager |
|---|---|---|---|---|
| **Dr. R. D. Deshmukh** | **Dr. S. M. Tale** | **Shri. M.A. Waykos** | **Ms. Kanchan R. Parihar** | **Mr. Ram D. Kalyankar** |

Date : 15.06.2026
Place : Nanded

For : **M/S SPML & Associates**
Chartered Accountant
FRN No. 136549W
**C. A. Prakash Gattani**
(Partner)
Membership No. 039757
Audit Panel No. 17342
UDIN : 260397575SHETNB2736

### Schedule 1 - Capital

| | | As on 31-3-2026 (Current Year) | As on 31-3-2025 (Previous Year) |
|---|---|---|---|
| I. | **For Nationalised Banks** | | |
| | Capital (Fully owned by Central Government) | 0.00 | 0.00 |
| | | **0.00** | **0.00** |
| II. | **For Banks incorporated outside India** | | |
| | **Capital** | | |
| | (i) The amount brought in by banks by way of start-up capital as prescribed by RBI should be shown under this head. | 0.00 | 0.00 |
| | (ii) Amount of deposit kept with the RBI under Section 11(12) of the Banking Regulation Act, 1949 | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **0.00** | **0.00** |
| III. | **For Other Banks** | | |
| | Authorised Capital | **20000000.00** | **20000000.00** |
| | (14903 shares of Rs. 1000 each) | | |
| | Issued Capital | 15613000.00 | 14903000.00 |
| | ( shares of Rs. each) | | |
| | Subscribed Capital | 0.00 | 0.00 |
| | (Nominal member shares of Rs. 100 each) | | |
| | Called-up Capital | 21200.00 | 9900.00 |
| | (_______shares of Rs. 1000 each) | | |
| | Less: Calls unpaid | | |
| | Add: Forfeited shares | | |
| | **Total Capital** | **15634200.00** | **14912900.00** |

### Schedule 2 - Reserves and Surplus

| | | | |
|---|---|---|---|
| I. | **Statutory Reserves** | | |
| | Opening Balance | 13527228.26 | 13210228.26 |
| | Additions During the year | 329000.00 | 317000.00 |
| | Deductions during the year | | 0.00 |
| | | **13856228.26** | **13527228.26** |
| II. | **Capital Reserves** | | |
| | Opening Balance | 38216657.69 | 36757569.65 |
| | Additions during the year | 970230.40 | 1459088.04 |
| | Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| | | **39186888.09** | **38216657.69** |
| III. | **Share Premium** | | |
| | Opening Balance | 0.00 | 0.00 |
| | Additions during the year | | |
| | Deductions during the year | | |
| | | **0.00** | **0.00** |
| IV. | **Revenue and Other Reserves** | | |
| | Opening Balance | 0.00 | 0.00 |
| | Additions during the year | 0.00 | 0.00 |
| | Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| | | **0.00** | **0.00** |
| V. | **Balance in Profit and Loss Account** | **1440952.30** | **1315586.56** |
| | **Total (I, II, III and V)** | **54484068.65** | **53059472.51** |

### Schedule 3 - Deposits

| | | | |
|---|---|---|---|
| A.I. | **Demand deposits** | | |
| | (i) From banks | | |
| | (ii) From others | 4157785.95 | 4323174.42 |
| II. | **Savings Bank Deposits** | **63224858.86** | **61973261.58** |
| III. | **Term Deposits** | | |
| | (i) From banks | 0.00 | 0.00 |
| | (ii) From others | 277481722.00 | 274548915.00 |
| | **Total (I,II and III)** | **344864366.81** | **340845351.00** |
| B. | (i) Deposits of branches in India | 0.00 | 0.00 |
| | (ii) Deposits of branches outside India | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **0.00** | **0.00** |

### Schedule 4- Borrowings

| | | | |
|---|---|---|---|
| I. | **Borrowings in India** | | |
| | (a) Reserve Bank of India | 0.00 | 0.00 |
| | (b) Other banks | 0.00 | 0.00 |
| | (c) Other institutions and agencies | 0.00 | 0.00 |
| II. | **Borrowings outside India** | 0.00 | 0.00 |
| | **Total (I and II) Borrowing** | **0.00** | **0.00** |

### Schedule 5- Other Liabilities and Provisions

| | | | |
|---|---|---|---|
| I. | Bills payable | 0.00 | 0.00 |
| II. | Inter-office adjustment (net) | 0.00 | 0.00 |
| III. | Interest accrued | 9600609.50 | 7732637.50 |
| IV. | Others (including provisions) | 28040817.00 | 45423224.59 |
| | **Total Other Liabilities & Provisions** | **37641426.50** | **53155862.09** |

### Schedule 6- Cash and Balances with Reserve Bank of India

| | | | |
|---|---|---|---|
| I. | **Cash in hand (including foreign currency notes)** | **5178756.00** | **4398618.00** |
| II. | **Balances with Reserve Bank of India** | **0.00** | **0.00** |
| | (a) in Current Account | 0.00 | 0.00 |
| | (b) in Other Accounts | 0.00 | 0.00 |
| | **Total (I and II)** | **5178756.00** | **4398618.00** |

### Schedule 7- Balances with Banks and Money at Call and Short Notice

| | | | |
|---|---|---|---|
| I. | **In India** | | |
| | **(i) Balances with banks** | | |
| | (a) in Current Accounts | 26697976.73 | 24998905.94 |
| | (b) in Other Deposit Accounts | 26743483.00 | 28091089.00 |
| | **(ii) Money at call and short notice** | | |
| | (a) with banks | 0.00 | 0.00 |
| | (b) with other institutions | 0.00 | 0.00 |
| | **Total (i and ii)** | **53441459.73** | **53089994.94** |
| II. | **Outside India** | | |
| | (i) in Current Accounts | 0.00 | 0.00 |
| | (ii) in Other Deposit Accounts | 0.00 | 0.00 |
| | (iii)Money at call and short notice | 0.00 | 0.00 |
| | **Total (i, ii, and iii)** | **0.00** | **0.00** |
| | **Grand Total (I and II)** | **53441459.73** | **53089994.94** |

### Schedule 8- Investments

| | | | |
|---|---|---|---|
| I. | **Investments in India** | | |
| | (i) Government Securities | 149709000.00 | 164512000.00 |
| | (ii) Other approved securities | 0.00 | 0.00 |
| | (iii) Shares | 0.00 | 0.00 |
| | (iv) Debentures and Bonds | 0.00 | 0.00 |
| | (v) Subsidiaries and/or joint ventures | 0.00 | 0.00 |
| | (vi) Others (to be specified) | 32998350.05 | 31998500.05 |
| | **Total** | **182707350.05** | **196510500.05** |
| II. | **Investments outside India** | | |
| | (i) Government securities (including local | 0.00 | 0.00 |
| | authorities) | 0.00 | 0.00 |
| | (ii) Subsidiaries and/or joint ventures abroad | 0.00 | 0.00 |
| | (iii) Others investments (to be specified) | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **0.00** | **0.00** |
| | **Grand Total (I and II) Investment** | **182707350.05** | **196510500.05** |

### Schedule 9- Advances

| | | As on 31-3-2026 (Current Year) | As on 31-3-2025 (Previous Year) |
|---|---|---|---|
| A. | (i) Bills purchased and discounted | 0.00 | 0.00 |
| | (ii) Cash credits, overdrafts and loans repayable on demand. | 5685328.62 | 4265041.02 |
| | (iii) Term loans | 167578242.00 | 168264205.00 |
| | **Total** | **173263570.62** | **172529246.02** |
| B. | (i) Secured by tangible assets | 0.00 | 0.00 |
| | (ii) Covered by Bank/Government | 0.00 | 0.00 |
| | Guarantees | 0.00 | 0.00 |
| | (iii) Unsecured | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **0.00** | **0.00** |
| C.I. | **Advances in India** | | |
| | (i) Priority Sectors | 0.00 | 0.00 |
| | (ii) Public Sector | 0.00 | 0.00 |
| | (iii) Banks | 0.00 | 0.00 |
| | (iv) Others | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **173263570.62** | **172529246.02** |
| C.II. | **Advances outside India** | | |
| | (i) Due from banks | 0.00 | 0.00 |
| | (ii) Due from others | 0.00 | 0.00 |
| | (a) Bills purchased and discounted | 0.00 | 0.00 |
| | (b) Syndicated loans | 0.00 | 0.00 |
| | (c) Others | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **0.00** | **0.00** |
| | **Grand Total (C.I and II)** | **173263570.62** | **172529246.02** |

### Schedules 10- Fixed Assets

| | | | |
|---|---|---|---|
| I. | **Premises** | | |
| | At cost as on 31st March, Preceding Year | 14769455.00 | 14769455.00 |
| | Additions during the year | 0.00 | 0.00 |
| | Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| | Depreciation to date | 0.00 | 0.00 |
| | **TOTAL I** | **14769455.00** | **14769455.00** |
| II. | **Other Fixed Assets (including furniture and fixtures)** | | |
| | At cost as on 31st March, Preceding Year | 4656342.25 | 4557842.25 |
| | Additions during the year | 155200.00 | 98500.00 |
| | Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| | Depreciation to date | 0.00 | 0.00 |
| | **TOTAL II** | **4811542.25** | **4656342.25** |
| | **Total (I and II) Fixed Assets** | **19580997.25** | **19425797.25** |

### Schedules 11- Other Assets

| | | | |
|---|---|---|---|
| I. | Inter-Office adjustments (net) | 0.00 | 0.00 |
| II. | Interest accrued | 14695027.29 | 12449946.52 |
| III. | Tax paid in advance/tax deducted at source | 25600.00 | 25600.00 |
| IV. | Stationary and stamps | 0.00 | 0.00 |
| V. | Non-banking assets acquired in satisfaction of claims | 0.00 | 0.00 |
| VI. | Others * | 3731301.02 | 3543882.82 |
| | **Total Other Assets** | **18451928.31** | **16019429.34** |

**** In case there is any unadjusted balance of loss the same may be shown under this item with appriopriate foot-note.***

### Schedule 12- Contingent Liabilities

| | | | |
|---|---|---|---|
| I. | Claims against the bank not acknowledged as debts | 0.00 | 0.00 |
| II. | Liability for partly paid investments | 0.00 | 0.00 |
| III. | Liability on account of outstanding forward exchange contracts | 0.00 | 0.00 |
| IV. | Guarantees given on behalf of consultants | 0.00 | 0.00 |
| | (a) In India | | |
| | (b) Outside India | | |
| V. | Acceptances, endorsements and other obligations | 0.00 | 0.00 |
| VI. | Other items for which the bank is contingently liable | 2849762.18 | 2808871.18 |
| | **Total Contingent Liabilities** | **2849762.18** | **2808871.18** |

### Schedule 13- Interest Earned

| | | | |
|---|---|---|---|
| I. | Interest/discount on advances/bills | 30047431.00 | 28840812.43 |
| II. | Income on investments | 12249178.83 | 13951931.03 |
| III. | Interest on balances with Reserve Bank of India and other inter-bank funds | 0.00 | 0.00 |
| IV. | Others | 0.00 | 0.00 |
| **V.** | **Total Interest Earned** | **42296609.83** | **42792743.46** |

### Schedule 14- Other Income

| | | | |
|---|---|---|---|
| I. | Commission, exchange and brokerage | 118000.14 | 176077.00 |
| II. | Profit on sale of investments | 1754964.35 | 2397583.07 |
| | *Less:* Loss on sale of investments | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **1754964.35** | **2397583.07** |
| III. | Profit on revaluation of investments | 0.00 | |
| | *Less:* Loss on revaluation of investments | 0.00 | |
| | **Total** | 0.00 | 0.00 |
| IV. | Profit on sale of land, buildings and other assets | | 0.00 |
| | *Less:* Loss on sale of land, buildings and other assets | | 0.00 |
| | **Total** | 0.00 | 0.00 |
| V. | Profit on exchange transactions | | 0.00 |
| | *Less:* Loss on exchange transactions | | 0.00 |
| | **Total** | 0.00 | 0.00 |
| VI. | Income earned by way of individuals, etc. | | 0.00 |
| | from subsidiaries/companies and/or joint | | |
| | ventures abroad/in India | | 0.00 |
| VII. | Miscellaneous Income | 968136.48 | 408597.33 |
| | **Total Other Income** | **2841100.97** | **2982257.40** |

***Note: Under items II to V loss figures shall be shown in brackets***

### Schedule 15- Interest Expended

| | | | |
|---|---|---|---|
| I. | Interest on deposits | 36282938.00 | 35996224.00 |
| II. | Interest on Reserve Bank of India/Inter-bank borrowings | 0.00 | 0.00 |
| III. | Others | 0.00 | 0.00 |
| | **Total Interest Expended** | **36282938.00** | **35996224.00** |

### Schedule 16- Operating Expenses

| | | | |
|---|---|---|---|
| I. | Payments to and provisions for employees | 3703516.00 | 3887506.00 |
| II. | Rent, taxes and lighting | 662959.26 | 705440.18 |
| III. | Printing and Stationary | 67133.67 | 60050.00 |
| IV. | Advertisement and publicity | 3420.00 | 17769.52 |
| V. | Depreciation on bank's property | 859185.84 | 823205.00 |
| VI. | Director's fees, allowances and expenses | 47875.00 | 50750.00 |
| VII. | Auditors' fees and expenses(including branch auditors) | 241314.40 | 227121.68 |
| VIII. | Law charges | 0.00 | 0.00 |
| IX. | Postages, Telegrams, Telephones, etc. | 62763.00 | 60337.05 |
| X. | Repairs and Maintenance | 65680.00 | 139784.00 |
| XI. | Insurance | 514232.86 | 496271.02 |
| XII. | Other expenditure | 1102192.47 | 1216298.85 |
| | **Total Operating Expenses** | **7330272.50** | **7684533.30** |

## INDEPENDENT AUDITORS REPORT

(As required under Banking Regulation Act, Clause No. 30 and 31 read with section 81(5)(b) rule 69 of the Maharashtra Co-Op. Societies Act)

**Report on Financial Statements**

We have audited the attached Balance Sheet of **GODAVARI URBAN CO-OPERATIVE BANK LTD, NANDED** as at 31st March 2026 and also the annexed Profit & Loss Account for the year ended on that date. These Financial statements are the responsibility of the Bank's management. Our responsibility is to express an opinion on those financial statements based on our audit.

We conducted our audit in accordance with the auditing standards generally accepted in India. Those standards require that we plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free of material misstatements. An audit includes examining, on a test basis, evidence supporting the amounts and disclosures in the financial statements. An audit also includes assessing the accounting principles used and significant estimates made by the management as well as evaluating the overall financial statement presentation. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion.

As reported by us in Part "A", "B" and "C" of our report, and subject to the limitations mentioned above in Para 1 and 2 the BALANCE SHEET and PROFIT AND LOSS ACCOUNT have been drawn up in accordance with the provisions of the Banking Regulation Act, 1949 read with Maharashtra Co-Operative Societies Act, 1960.

We further state that,

Income tax provision of Rs.1,00,000/-& GST (RCM) provision of Rs.59,760/- has not been made, due to this the profit has been overstated by Rs.1,59,760/-

As per profit & loss account profit of the bank is Rs.1440952.00 , due to above provisions , the profit shall be reduced by Rs. 1,59,760/- after considering the effects of above provisions, the profit of bank will be revised to Rs.12,81,192/-

**Subject to above Remarks, We report that :**

We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.

The transactions of the Bank which have come to our notice were within the powers of the Bank.

In our opinion, proper books of accounts as required by law were kept by the Bank so far as it appears from our examinations of those books and proper returns adequate for the purpose of our audit were received from the branches of the Bank.

The Balance Sheet and the Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of accounts and returns.

There has been no material impropriety and irregularity in the expenditure or in the realizations of the money due to the Bank, excepting the transactions reported in Part "A", "B" and "C" Audit Report of even date, the said accounts together with the notes thereon does give true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India and to our comment in Part "A".

In the case of Balance Sheet of the State of affairs of the Bank as on 31.03.2026.

In the case of the Profit & Loss Account of the Profit for the year ended as on that date.

**The Bank is awarded classification "A" Class for the financial year 2025-2026.**

Date : 15.06.2026
Place : Nanded

For :
**M/S SPML & Associates**
Chartered Accountant
FRN No. 136549W
**C. A. Prakash Gattani** (Partner)
Membership No. 039757
Audit Panel No. 17342
UDIN : 260397575SHETNB2736

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# प्रशासनाच्या दणक्याने नरसी येथील २५ वर्षांचे अतिक्रमण बुलडोझरखाली

- महामार्गालगतची अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त
- रस्ते मोकळे झाल्याने नागरिकांमध्ये समाधान



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** नरसी येथील मुख्य चौकासह नरसी-मुखेड, नरसी-बिलोली, नरसी-देगलूर आणि नरसी-नांदेड या महत्त्वाच्या मार्गांवर गेल्या दोन ते अडीच दशकांपासून फोफावलेल्या अतिक्रमणांवर बुधवार, दि. २४ जून रोजी प्रशासनाने बुलडोझर चालवत मोठी कारवाई केली. या धडक मोहिमेमुळे परिसरातील अतिक्रमणधारकांमध्ये खळबळ उडाली असून, नागरिकांनी मात्र या कारवाईचे स्वागत केले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आदेशानुसार आणि महामार्गाच्या हद्दीत नियमबाह्य पद्धतीने उभारण्यात आलेल्या पत्र्याच्या शेड्स, दुकाने, ओटे, तात्पुरती बांधकामे तसेच इतर अतिक्रमणे हटविण्यासाठी ही मोहीम राबविण्यात आली. संबंधितांना यापूर्वी अनेक वेळा नोटिसा बजावून अतिक्रमणे स्वखर्चाने हटविण्याची संधी देण्यात आली होती. मात्र प्रशासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने अखेर कठोर पाऊल उचलण्यात आले.

कारवाईदरम्यान बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांनी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. संभाव्य कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचारी सतर्क होते. जेसीबी व इतर यंत्रसामग्रीच्या सहाय्याने अनेक वर्षांपासून महामार्गालगत उभी असलेली अतिक्रमणे काही तासांत जमीनदोस्त करण्यात आली.

नरसी चौक हे तालुक्यातील प्रमुख वाहतूक केंद्र असल्याने येथे दिवसेंदिवस वाढणाऱ्या अतिक्रमणांमुळे वाहनचालक, प्रवासी आणि व्यापाऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. रस्त्यांची रुंदी कमी झाल्याने वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि पादचाऱ्यांची गैरसोय वाढत होती. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने अखेर कठोर भूमिका घेत अतिक्रमणांविरोधात निर्णायक कारवाई केली.

बिलोलीचे उपविभागीय अधिकारी श्याम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या मोहिमेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस प्रशासनाने संयुक्त सहभाग घेतला. कारवाईदरम्यान काही अतिक्रमणधारकांनी नाराजी व्यक्त केली असली तरी प्रशासन आपल्या भूमिकेवर ठाम राहिले.

या कारवाईनंतर नरसी चौकाचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलल्याचे चित्र दिसून आले. अनेक वर्षांपासून अतिक्रमणांच्या विळख्यात अडकलेले रस्ते मोकळे झाल्याने वाहनचालक, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले. भविष्यातही अशाच प्रकारे अतिक्रमणांविरोधात सातत्याने मोहिमा राबविल्या गेल्यास शहरांचे सुशोभीकरण आणि वाहतूक व्यवस्था सुधारण्यास मोठी मदत होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## चार वर्षांच्या चिमुरड्याचा खून; बापास जन्मठेप

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोटच्या चार वर्षांच्या चिमुरड्याला जिवंत पोत्यात बांधून नायगाव शिवारात गोदावरी नदी पात्रात फेकून खून करून पुरावा नष्ट करणाऱ्या बापाला कंधार न्यायालयाचे न्यायाधीश एम. एन. पाटील यांनी बुधवार दि. २४ जून रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

अभिषेक बेपत्ता झाल्याने सुरुवातीला कंधार पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपासचक्र फिरवून माधव आणि त्या नातेवाईकांकडे सखोल चौकशी केली असता, या कृत्याचा उलगडा झाला. ३० मार्च २०२२ रोजी पोलिसांनी अभिषेकचा मृतदेह गोदावरीच्या पात्रातून शोधून काढला. एका निष्पाप जीवाचा आपल्याच पित्याकडून असा अंत झाल्याचे पाहून संपूर्ण परिसर हादरून गेला होता.

कंधार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पडवळ आणि उपनिरीक्षक इंद्राळे यांनी या प्रकरणाचा अत्यंत बारकाईने तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकार पक्षातर्फे एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले. सरकारी वकील ॲड. महेश कागणे यांनी मांडलेला प्रभावी युक्तिवाद आणि पुराव्यांच्या आधारे न्यायाधीश एम. एन. पाटील यांनी आरोपीला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

# अर्धापूर तालुक्यासाठी ७.२४ कोटींचा निधी मंजूर

## आ. श्रीजया चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश



**नांदेड (प्रतिनिधी)–** अर्धापूर तालुक्यातील जलसंधारण आणि शेती विकासाला मोठी चालना मिळाली असून, आमदार श्रीजया चव्हाण यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर ७ कोटी २४ लाख ४ हजार ४३० रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून तालुक्यातील २९ हजार ७०० मीटर लांबीच्या नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात येत असून, अनेक ठिकाणी कामांना वेग आला आहे. या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे भूजल पातळीत वाढ, जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन आणि शेतीची सुपीकता वाढण्यास मोठी मदत होणार असल्याचे सांगण्यात आले.

बहुतांश शेती पावसावर अवलंबून असलेल्या अर्धापूर तालुक्यात जलसाठा वाढविणे आणि भूजल पुनर्भरण मजबूत करणे ही काळाची गरज होती. ही गरज ओळखून आमदार श्रीजया चव्हाण यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने नाला खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामांसाठी भरीव निधी मंजूर झाला आहे. कामे पूर्ण झाल्यानंतर नाल्यांमधील पाणीसाठवण क्षमता वाढणार असून, परिसरातील विहिरी, बोअरवेल आणि जलस्रोतांना मोठा फायदा होणार आहे. राज्य सरकारच्या 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' या उपक्रमाच्या माध्यमातून जलसुरक्षा बळकट करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या योजनेत स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायती आणि स्थानिक नागरिकांचा सहभाग आहे. धरणे व नाल्यांमधील गाळ काढून जलसाठ्यांची क्षमता वाढविण्यासोबतच तो गाळ शेतकऱ्यांच्या शेतात उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे जमिनीची सुपीकता वाढून उत्पादनक्षमतेत भर पडते.

अर्धापूर तालुक्यातील विविध गावांमधून नाला खोलीकरण व रुंदीकरणाची मागणी होत होती. या मागणीची दखल घेत माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार श्रीजया चव्हाण यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यातून ७.२४ कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊन कामांना हिरवा कंदील मिळाला. या योजनेअंतर्गत कामठा-खडकी नाला, खडकी-मेंढला नाला, सांगवी-मेंढला नाला, लहान-लोणी खुर्द नाला, निमगाव-सिंचन तलाव नाला, चिंचबन-अर्धापूर नाला, अर्धापूर-इसामपूर नाला, अहमदपूर (डी)-इसामपूर नाला, इसामपूर-सांगवी नाला, शेणी शाखा नाला, गणपूर-सांगवी नाला, देळूब बु.-देळूब कोपब नाला, देळूब बु.-कोंढा शाखा नाला तसेच जावळा शिवार-भोगाव शाखा नाला या कामांचा समावेश आहे. उन्हाळ्यात नाल्यांतील पाण्याची पातळी कमी होत असल्याने गाळ काढल्यानंतर जलसाठा वाढण्यास मदत होणार आहे. तसेच नाल्यातून निघणारा सुपीक गाळ शेतात टाकल्याने कृषी उत्पादनात वाढ होणार आहे. त्यामुळे या योजनेचा थेट लाभ शेतकरी, ग्रामस्थ आणि जलसाठा क्षेत्रातील नागरिकांना मिळणार आहे.

# नवीन कायद्याला पंजप्यारे साहिबानसह शीख समाजाचा विरोध



**नांदेड (प्रतिनिधी)–** मागील रविवारी महाराष्ट्र शासनाने मंत्रिमंडळ बैठकीत नांदेड येथील सर्वोच्च धार्मिक संस्था दी नांदेड सिख गुरुद्वारा तखत सचखंड बोर्ड कायदा १९५६ रद्द करुन प्रस्तावित नवीन कायदा सचखंड हजुरसाहिब गुरुद्वारा अधिनियम २०२६ लागू करण्यास मंजुरी देण्यात आली. आता महसूल विभाग वरील निर्णय विधानसभा अधिवेशन सत्रात ठेवण्यासाठी सरसावला आहे. ज्यामुळे सिख समाजात मोठी नाराजी आहे. पंजप्यारे साहिबान यांनी देखील शासन निर्णय योग्य नाही म्हणून नवीन कायद्याला विरोध दर्शविला आहे.

महाराष्ट्र शासनाने सन १९५६ चा कायदा रद्द करण्याची दोन प्रमुख कारणं प्रस्तुत केली आहेत. एक तर हा कायदा निजामकालीन व जुना आहे. दुसरे, दिवसेंदिवस यात्रेकरूंची संख्या वाढत असल्यामुळे प्रबंधनासाठी नवीन कायद्याची गरज आहे. गुरुद्वारा तखत सचखंड बोर्ड कायदा हा सन १९५६ मध्ये सप्टेंबर महिन्यात हैदराबाद स्टेट पण स्वतंत्र भारतात नोंदणीकृत झाला होता. नंतर तो कायदा मुंबई स्टेट व पुढे सन १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्र शासनात वर्ग करण्यात आला. त्यावेळी निजामाची राजवट असण्याचे कारणच नव्हते. सन १९४८/४९ मध्ये भारताने हैदराबाद स्टेट विरुद्ध सैनिक कार्यवाही केली होती. समस्त मराठवाड्याला हे इतिहास माहीत आहे. सैनिक कार्यवाहीनंतर निजाम शासनाने शरणागती पत्करली आणि समस्त हैदराबाद स्टेट भारतात विलीन झाले.

गुरुद्वारा सचखंड बोर्ड कायदा १९५६ मध्ये नोंदणीकृत झाला. तो कायदा निजामकालीन कसा झालायाचे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री बावनकुळे यांनी द्यावे. तसेच भाविकांची संख्या वाढत असल्यामुळे व्यवस्थापन सुधारणे गरजेचे आहे. शासनाकडे नांदेडला येणाऱ्या भाविकांच्या उपस्थितीचे कोणतेच आकडे उपलब्ध नाहीत. गुरुद्वारा बोर्डाकडे देखील सांख्यीकी आलेख उपलब्ध नाहीत. २००८ साली नांदेडला गुरुतागद्दी त्रिशताब्दी सोहळा पार पडला. यावेळी दोन दोन विकास योजना राबविण्यात आल्या होत्या. येत्या ५० वर्षाचे नियोजन करण्यात येत असल्याचे नांदेडच्या शीख समाजाला सांगण्यात आले होते.

नांदेडची गुरुद्वारा सचखंड बोर्ड संस्था ही एक तखत (धर्मपीठ) आहे. त्याच्या प्रबंधनाची काळजी शासनाने करू नये. सध्याचा १९५६ कायदा हा योग्य व सर्वसमावेशक आहे. ज्याच्यात शीख समाजाला राष्ट्रीयस्तरावर प्रतिनिधित्व आहे. नवीन कायदा करण्यासाठी मुंबईच्या काहींची मागणी असल्यामुळे शासन नांदेड व दक्षिण भारतीय शीख समाजावर अन्याय करत आहे. नवीन कायदा लादू नये, अशी मागणी नांदेड येथील शीख समाजाच्यावतीने करण्यात आली आहे.

# 'छात्रों की गुंज' अभियानांतर्गत नांदेडमध्ये विद्यार्थी संवाद कार्यक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)–** काँग्रेस पक्षाच्या देशव्यापी 'छात्रों की गुंज शिक्षा बचाव, भविष्य बचाव' अभियानांतर्गत नांदेड येथील तुलसी कम्फर्ट हॉटेलमध्ये नांदेड जिल्हा एनएसयूआयच्या वतीने विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत व नांदेड जिल्हाचे खासदार प्रा. रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शना- खाली झालेल्या या कार्यक्रमात नीट परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी, पालक व युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

यावेळी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधताना हर्षवर्धन सपकाळ यांनी शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न जाणून घेतले. स्पर्धा परीक्षांमधील वाढती असुरक्षितता, शिक्षणाचे व्यापारीकरण, वाढती फी, कोचिंग संस्कृतीचा प्रभाव तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणापर्यंत पोहोचण्यात येणाऱ्या अडचणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना केवळ गुणांच्या चौकटीत न मोजता त्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणारी शिक्षणव्यवस्था उभी राहणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

नांदेड जिल्हा एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष सुरज पाटील शिंदे आणि शहराध्यक्ष अक्षय नळगे यांच्या नियोजनातून पार पडलेल्या या कार्यक्रमात युवक हे देशाच्या विकासाचे केंद्रबिंदू असून त्यांना संधी, मार्गदर्शन आणि विश्वास देणारी व्यवस्था निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन हर्षवर्धन सपकाळ यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या आकांक्षा आणि संघर्ष समजून घेऊन शिक्षणाला सामाजिक न्यायाची दिशा देणारी धोरणे राबविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

कार्यक्रमास माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर, दक्षिण जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, शहराध्यक्ष अब्दुल गफार, माजी उपमहापौर आनंदराव चव्हाण, ज्येष्ठ नेते अनिल मोरे, रामदास पाटील सुमठाणकर, डॉ. रेखा चव्हाण, धनराज राठोड, जेसिका शिंदे, श्रावण रॅपनवाड, सुरेंद्र घोडजकर, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी गाढे पाटील, शहराध्यक्ष शंकर पाटील शिंदे यांच्यासह काँग्रेस, युवक काँग्रेस, पदाधिकारी पालक व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरलीधर हंबर्डे यांनी केले.

# खडकपुरा खून प्रकरणात आरोपींची संख्या दहावर

## २६ जूनपर्यंत पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील खडकपुरा भागात सय्यद रहेमान दुल्हेशाह दर्ग्याचे नायब मुतवल्ली शेख शमीम शेख इसाक यांच्या हत्या प्रकरणाचा तपास पोलिसांनी वेगाने पूर्ण केला आहे. वजिराबाद पोलिसांनी २३ जूनच्या मध्यरात्री आणखी पाच आरोपींना अटक केली असून, या गुन्ह्यातील एकूण आरोपींची संख्या आता १० वर पोहोचली आहे. न्यायालयाने या पाचही जणांना २६ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावल्याने तपासाला नवी दिशा मिळाली आहे.

ही दुर्दैवी घटना २१ जून रोजी मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास वाघी रोड परिसरात घडली होती. शेख शमीम हे आपल्या मित्रासोबत बसलेले असताना हल्लेखोरांनी त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. हल्लेखोरांनी प्रथम पिस्तुलातून गोळ्या झाडल्या आणि त्यानंतर तलवार व खंजिराने शरीरावर असंख्य वार केले. या भीषण हल्ल्यात शेख शमीम यांचा जागीच मृत्यू झाला.

पोलीस तपास आणि नवीन अटक घटनेचे गांभीर्य ओळखून वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३०२/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपअधीक्षक रामेश्वर व्यंजने यांच्या नेतृत्वाखाली तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली. पोलिसांनी २२ जूनच्या मध्यरात्री गुप्त माहितीच्या आधारे वजिराबाद आणि एलसीबीच्या पथकाने पाच जणांना ताब्यात घेतले.

यावेळी अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अब्दुल तौखीर अब्दुल सगीर (वय २४), शेख सादिक शेख चांद पाशा (वय २६), शेख नजीर शेख रशीद (वय २७), रियाल सलीम सय्यद कासिम, जुबेर खान अकबर खान (वय २१) या पाच जणांचा समावेश होता. त्यांना २३ जून रोजी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना २६ जूनपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले होते. अटक केलेल्यांमध्ये प्रत्यक्ष हल्ला करणाऱ्या चार जणांचा समावेश होता. या प्रकरणात अद्यापही काही आरोपी फरार असून, पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने करत आहेत.

## सचखंड एक्सप्रेसच्या मार्गात तात्पुरता बदल

**नांदेड (प्रतिनिधी)–** उत्तर मध्य रेल्वेच्या ललितपूर स्थानकावर सुरू असलेल्या यार्ड रिमॉडेलिंग कामाच्या पार्श्वभूमीवर काही गाड्यांच्या मार्गात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सुविधेसाठी आणि सुरक्षित रेल्वे संचालनासाठी हा निर्णय घेतला आहे.

या अनुषंगाने गाडी क्रमांक १२७१६ अमृतसर - हजूर साहिब नांदेड सचखंड एक्सप्रेस ही मथुरा ते भोपाळ दरम्यान आपला नियोजित मार्ग सोडून बदलेल्या मार्गाने धावेल. १७ जुलै ते २० जुलै या कालावधीत धावणाऱ्या गाडीच्या ४ फेऱ्या मथुरा, बयाना, कोटा, नागदा, संत हिरडाराम नगर, भोपाळ या सुधारित मार्गाने चालविण्यात येतील. प्रवाशांनी आपल्या प्रवासाचे नियोजन करताना या बदलाची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी रेल्वे चौकशी सेवा, रेल्वे हेल्पलाइन १३९ किंवा जवळच्या रेल्वे स्थानकाशी संपर्क साधावा.

# कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी आता एकाच व्यासपीठावर; विकासकामांना गती मिळणार की राजकीय संघर्ष कायम राहणार ?

**हदगाव (प्रतिनिधी)–** हदगाव - हिमायतनगर मतदार संघाच्या राजकारणात गेल्या काही वर्षांपासून खासदार आष्टीकर आणि आमदार कोहळीकर हे दोन प्रभावी नेते एकमेकांचे कट्टर राजकीय विरोधक म्हणून ओळखले जात होते. निवडणुकांपासून ते विविध राजकीय घडामोडींमध्ये दोन्ही नेत्यांमधील संघर्ष नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. मात्र बदलत्या राजकीय परिस्थितीत खा. आष्टीकर यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर या मतदारसंघातील राजकीय समीकरणाला नवे वळण मिळाले आहे.

विशेष म्हणजे आ. कोहळीकर हे आधीपासूनच शिंदे गटाशी एकनिष्ठ राहून मतदारसंघातील विकासाचा मुद्दा पुढे करत आहेत. दुसरीकडे खा. आष्टीकर यांनीही शिंदे गटात प्रवेश करताना मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी सत्तेच्या माध्यमातून अधिकाधिक निधी व प्रकल्प आणण्याचा उद्देश असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे आता लोकसभा व विधानसभा या दोन्ही स्तरांवरील प्रतिनिधी एकाच राजकीय विचारधारेच्या छत्राखाली कार्यरत असल्याने विकासकामांना निश्चितच वेग यावा, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त





होत आहे.

मतदारसंघातील प्रलंबित रस्ते, सिंचन, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराशी संबंधित प्रश्न अनेक वर्षांपासून चर्चेत आहेत. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी खासदार आणि आमदार यांच्यातील समन्वय महत्त्वाचा मानला जातो. आता दोन्ही नेते एकाच गटात असल्यामुळे निधी मंजुरी, प्रशासकीय पाठपुरावा आणि विकास योजनांच्या अंमलबजावणीत अधिक सुसूत्रता निर्माण होईल का, याची उत्सुकता राहणार आहे. राजकीय जाणकारांच्या मते, वैचारिक आणि राजकीय मतभेद बाजूला ठेवून दोन्ही नेत्यांनी मतदारसंघाच्या विकासासाठी एकत्रित प्रयत्न केल्यास-हदगाव, हिमायतनगर मतदारसंघाच्या विकासाला नवी दिशा मिळू शकते. मात्र पूर्वीची राजकीय कटुता कितपत बाजूला ठेवली जाते आणि विकासाच्या मुद्यावर किती प्रभावी समन्वय साधला जातो, यावरच पुढील राजकीय चित्र अवलंबून राहणार आहे.

सध्या तरी मतदारसंघातील जनतेची नजर या दोन्ही नेत्यांच्या पुढील भूमिकेकडे लागली असून, एकाच गटातील दोन मोठे नेते विकासाचा नवा अध्याय लिहितात की, राजकारणातील जुनी दरी कायम राहते, याचे उत्तर येणारा काळच देणार आहे.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com